नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१


नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५१ * अंक २२३ * | * अमरावती * | रविवार, दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त




# टिपूवरून रणकंदन!

## ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समकक्ष मानले जावे : सपकाळांच्या विधानावरून वादंग

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. १४ :
काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी वादग्रस्त विधान करत महाराष्ट्रात नव्या वादाला तोंड फोडले आहे.

ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी शौर्य आणि स्वराज्य असा विचार दिला, अगदी त्याचप्रमाणे टिपू सुलतान यांनी त्याच समकक्ष काम केले आहे. त्यामुळे टिपू सुलतान यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकक्ष मानले गेले पाहिजे, असे विधान सपकाळ यांनी केले आहे.

यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. हर्षवर्धन सपकाळ यांना लाज वाटली पाहिजे, तसेच त्यांनी माफी मागावी, अशी मागणी फडणवीस यांनी केली आहे.

मालेगावात महानगरपालिकेतील उपमहापौरांच्या दालनातील टिपू सुलतानच्या फोटोवरून वाद निर्माण झालेला असतानाच, त्यात हर्षवर्धन सपकाळ यांच्या वादग्रस्त विधानाने आणखी वाद पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सपकाळ म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांचं शौर्य ज्याप्रकारचे आहे, त्यांनी जो स्वराज्याचा विचार दिला, त्याच मांदियाळीत, त्यांच्यानंतर बऱ्याच वर्षांनी टिपू सुलतान यांनी इंग्रजांच्याविरोधात लढा पुकारला होता. त्या अर्थाने टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे योद्धे होऊन गेले, भारताचे



भूमिपूत्र होऊन गेले, त्यांनी कधीही कोणत्याही विषारी, विखारी विचारांना जवळ केले नाही. त्यामुळे शौर्याचे लक्षण म्हणून आपण टिपू सुलतान यांच्याकडे शिवाजी महाराजांच्या समकक्ष पाहिले पाहिजे, असे सपकाळ बुलढाण्यात म्हणाले.

दरम्यान, यावेळी बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी राजकारणावरही भाष्य केले आहे. ते म्हणाले, नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयात ५० हजारांची लाच घेतली, हे प्रकरण फार छोटे आहे. हे संपूर्ण सरकारच लाचखोर आहे.

नरहरी झिरवाळ यांच्यावर कारवाई तर व्हायलाच पाहिजे पण कोट्यवधी रुपये खाणारे देवेंद्र फडणवीसांवर काय कारवाई करणार हे आधी सांगा. या असंवैधानिक सरकारचा आम्ही निषेध करतो.

## त्यांना लाज वाटली पाहिजे



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :
काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रमाणेच टिपू सुलतान यांनाही मान दिला गेला पाहिजे असे वादग्रस्त विधान केले आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली असून, त्यांना लाज वाटली पाहिजे. टिपू सुलतानसारख्या नराधमाची तुलना छत्रपती शिवरायांशी करण्याचे जे काम त्यांनी केले आहे ते अतिशय निंदनीय असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे.

फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवरायांनी स्वराज्य तयार केले. मुघलांच्या जोखडातून सामान्य जनतेला मुक्त करण्याचे काम केले. ख?या अर्थाने सामान्य रयतेचे राज्य तयार करणारे छत्रपती शिवराय होते. आणि त्याच वेळी हजारो लाखो हिंदूंची हत्या करणे टिपू सुलतान. या दोघांची तुलना करून दोघांना सारखे सन्मान द्या म्हणणे यापेक्षा जास्त लांगूलचालन, जोडे चाटणे मी या जन्मात बघितले नाही. आम्ही हे बिलकुल सहन करणार नाही.

टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवरायांशी केळ्की त्याबद्दल त्यांनी माफी मागितली पाहिजे, अशी मागणी फडणवीस यांनी केली आहे. तसेच अशा पद्धतीने ते बोलत असतील आणि काँग्रेस पक्षाने जरा जरी थोडी जरी नैतिकता राहिली असेल तर त्यांनी त्यांची भूमिका मांडली पाहिजे.

मुलुंडमध्ये जो अपघात झाला त्याविषयी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुलुंडमध्ये जो अपघात झाला हा अत्यंत दुदैवी आहे. त्या ठिकाणी जे काम चालले होते, त्यात स्लॅब पडला. त्यात दुदैवी मृत्यू देखील झाला आहे, त्यांच्या कुटुंबीयांसोबत आमच्या प्रार्थना आहेत. जे जखमी झाले आहेत त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची सगळी काळजी ही एमएमआरडीएच्या माध्यमातून आणि राज्य सरकारच्या माध्यमातून घेतली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. याला कोण जबाबदार आहे, त्यांच्यावरही कारवाई केली जाईल. आणि तात्काळ जिथे जिथे काम चालू आहे तिथे सेफ्टी ऑडिट करून त्या ठिकाणी अशी घटना घडणार नाही या प्रकारचे प्रयत्न केले जातील.

# मेट्रोचा स्लॅब कोसळला

### ऑटो, कारचा चेंदामेंदा; १ ठार, ३ जखमी
### मुलुंडच्या एलबीएस रोडवर घडली दुर्घटना



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :
मेट्रो पुलाचा स्लॅब कोसळून १ जण ठार व ३ जण जखमी झाल्याची घटना मुंबईच्या मुलुंड पश्चिम परिसरातील एलबीएस रोडवर घडली. वर्दळीच्या वेळी ही घटना घडल्यामुळे खळबळ माजली.

काँग्रेस व ठाकरे गटाने या प्रकरणी सरकारवर सडकून टीका करत सरकार व एमएमआरडीए प्रशासनाला मुंबईकरांच्या जीवाचे काहीही देणेघेणे नसल्याचा आरोप केला आहे.

माहितीनुसार, मुलुंड पश्चिम परिसरातील एलबीएस रोडवर मेट्रो पुलाचे काम सुरू आहे. या पुलाच्या स्लॅबचा एक तुकडा शनिवारी दुपीर १२.२० च्या सुमारास अचानक रस्त्याने जाणाऱ्या ऑटो व एका कारवर पडला. त्यात ऑटो व कारमधून प्रवास करणारे ३-४ जण जखमी झाले. या जखमींना तत्काळ लगतच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान एका जखमीचा मृत्यू झाला आहे.

मृत्यू झालेल्या व्यक्तीची ओळख अद्याप पटली नाही. गंभीर गोष्ट म्हणजे या ठिकाणी पुलाचे काम सुरू असतानाही बॅरिकेट्स लावण्यात आले नव्हते किंवा इतर योग्य ती उपाययोजनाही करण्यात आली नव्हती. त्यामुळे या प्रकरणी तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

स्लॅब कोसळल्याच्या घटनेनंतर मुंबई अग्निशमन दल, स्थानिक पोलिस, मेट्रो प्राधिकरणाचे कर्मचारी व संबंधित विभागाचे कर्मचारी रुग्णवाहिकेसह घटनास्थळी पोहोचले. त्यांनी संपूर्ण परिसर ताब्यात घेऊन वाहतूक वळवली. रस्त्यावर पडलेला ढिगारा हटवला. सध्या हा अपघात नेमका कशामुळे झाला? याचा तपास सुरू आहे. तसेच या प्रकरणी बांधकामाविषयी सुरक्षेच्या नियमांचे पालन करण्यात आले होते का? याचीही चौकशी केली जात आहे.


मुलुंड येथील एलबीएस रोडवर गत अनेक महिन्यांपासून मेट्रोच्या मार्गिकेचे काम सुरू आहे. या प्रकरणी दररोज भलेमोठे गर्डर व स्लॅब वर-खाली चढवण्याचे काम सुरू असते. त्यातच आज ही दुर्घटना घडली.

## थोडक्यात..

### इंडिगोच्या विमानात बॉम्ब असल्याची धमकी

■ **कोलकाता :** कोलकात्याच्या नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळावर इंडिगोच्या एका विमानात बॉम्ब असल्याची धमकी मिळाल्याने घबराट पसरली. विमानतळ संचालकांनी सांगितले की, सकाळी ९:१५ वाजता कोलकाताहून निघालेल्या इंडिगोच्या विमान क्रमांक ६ए३०७४ मध्ये बॉम्ब असल्याची धमकी मिळाली. बॉम्बची धमकी मिळताच प्रवासी घाबरले.

कागदाच्या तुकड्यावर एक धमकीची चिठ्ठी लिहिली होती. इंडिगो विमानाला आयसोलेशन बेमध्ये नेण्यात आले आणि त्याची कसून तपासणी करण्यात आली. विमानात चढताना, क्रू मेंबर्सना शौचालयाच्या डब्यात एक कागद सापडला, ज्यामध्ये विमानात बॉम्ब असल्याचे म्हटले होते. प्रवाशांना ताबडतोब बाहेर काढण्यात आले. तपास अजूनही सुरू आहे. प्रवाशांची आणि विमानाची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी मानक कार्यप्रणालीनुसार सर्व खबरदारीचे उपाय केले जात असल्याचे विमानतळ अधिकाऱ्यांनी सांगितले.






# भारत आणि अमेरिका करारामध्ये सोयाबीन-कापूस आयातीचा उल्लेख नाही

## शेतकऱ्यांनी अफवांवर विश्वास न ठेवण्याचा फडणवीस यांचा सल्ला

■ **वृत्तसंस्था,बीड, दि. १४ :**

आमची माय आणि आमची माती हेच आमचे खरे प्रेम आहे. ज्याप्रमाणे शिवशंभूंच्या दर्शनापूर्वी नंदीला वंदन करण्याची आपली संस्कृती आहे, त्याच धर्तीवर पशुधनाला केंद्रस्थानी ठेवून आम्ही ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक बळकट करत आहोत. तंत्रज्ञानाच्या जोडणीतून हे क्षेत्र महाराष्ट्राला जागतिक स्तरावर दुग्ध उत्पादनात अग्रेसर करेल, असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.परळीतील अंबेजोगाई रस्ता लगत असलेल्या ओपळे मैदानावर पशुसंवर्धन विभाग आयोजित तीन दिवसीय महा पशुधन एक्स्पोच्या पाहणीनंतर मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. भारत- अमेरिका करारात सोयाबीन किंवा कापूस आयातीचा उल्लेख नसून शेतकऱ्यांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन देखील त्यांनी केले.



मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, हे प्रदर्शन केवळ एक सोहळा नसून कोरडवाहू शेतीतील हवामान जोखीम कमी करण्यासाठी उचललेले एक धोरणात्मक पाऊल आहे. पिकांचे नुकसान झाले तर पशुधन हेच शेतकऱ्यासाठी आधार म्हणून काम करते. त्यामुळेच आम्ही गाईला केवळ धार्मिक महत्त्व न देता तिचे आर्थिक योगदान लक्षात घेऊन राज्यमाता दर्जा दिला आहे.

दुग्ध व्यवसायातील तफावत मांडताना मुख्यमंत्री म्हणाले की, पंजाबमध्ये गाय १०-१५ लिटर दूध देते, तर आपल्याकडे २.५ लिटर ही तफावत भरून काढण्यासाठीचे प्रयत्न सुरु आहेत. पशुधन संवर्धन, आरोग्य व अचूक निरीक्षण आणि उत्पादकता वाढविण्यासाठी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स (अक) मिशन' चा वापर करण्यात येईल. एम्ब्रियो ट्रान्सप्लांट आणि सेक्स-सॉर्टेड सीमेन तंत्रज्ञानाद्वारे उच्च दर्जाच्या कालवडींची पैदास वाढवून दुग्धोत्पादन वाढवले जाईल. यासाठी विदर्भ- मराठवाड्यात 'मदर्स डेअरी' सोबत करार देखील करण्यात आला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृषी क्षेत्राला जागतिक स्पर्धेपासून सुरक्षित ठेवले आहे. भारत- अमेरिका करारात सोयाबीन किंवा कापूस आयातीचा कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे बाहेरील माल येऊन भाव पडतील, या अफवांवर शेतकऱ्यांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. याउलट भारतीय शेतकऱ्यांना अमेरिकेची मोठी बाजारपेठ आता खुली झाली असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

अहिल्यादेवी होळकर शेळी-मेंढी पालन योजनेतील विजेत्यांना आणि गोपाळ रत्न पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांना यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरविण्यात आले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते पशुसंवर्धन विभागाच्या 'महापशुधन वार्ता' या मासिकाच्या 10व्या अंकाचे प्रकाशन व विभागाच्या 'दिनदर्शिका 2026'चे अनावरण केले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी महापशुधन एक्स्पो 2026 मध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत पात्र महिला बचत गटांना प्रातिनिधिक स्वरूपात कर्ज वितरण केले. जिरेवाडी, ता. परळी येथील तुळजाई महिला स्वयंसहायता समूहास 15,00,000 इतक्या कर्जाचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद)च्या स्मार्ट प्रकल्पांतर्गत बदार्पूर येथील उमेद सखी - महिला शेतकरी उत्पादक कंपनीला शासन अनुदानाच्या 12,27,500 या प्रथम हप्त्याचे वितरण करण्यात आले.

विदर्भ मराठवाडा दुग्धोत्पादन प्रकल्प आणि पशुधन विकास महामंडळ नागपूर यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य कराराचे प्रतिकात्मक हस्तांतरण यावेळी करण्यात आले. पशुधन विकास मंडळ नागपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी शितल मुकणे आणि मुख्य शास्त्रज्ञ महात्मा फुले कृषी विद्यापीठ सोमनाथ माने त्यासोबतच डॉ. दिनकर बोर्डे उपायुक्त पशुसंवर्धन जिल्हा परिषद सातारा व विदर्भ मराठवाडा उत्पादन प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय गोराडे यांना यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कराराच्या प्रति हस्तांतरित करण्यात आल्या.

## पतीला वाचवताना पत्नीचा विजेच्या धक्क्याने मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी**
**नाशिक, दि. १४ :**

पतीला मृत्यूच्या दाढेतून खेचून काढणाऱ्या पत्नीचा विजेचा धक्का लागून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील शिंदेवाडीत घडली आहे. मृत महिलेच्या पतीला विजेचा धक्का बसला होता. तिने त्यांना जोरात धक्का देऊन तेथून बाहेर ढकलले. पण हे करताना सदर महिला मात्र वीजेच्या प्रवाहात अडकली आणि तिचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरावर शोककळा पसरली आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, छाया दीपक खाडे (38) असे मृत महिलेचे नाव आहे. छाया यांचे पती दीपक खाडे (42) हे शुक्रवारी सकाळी 8 च्या सुमारास शेतातील विहिरीवर पिकांना पाणी देण्यासाठी गेले होते. वीजपंप सुरू करण्यासाठी त्यांनी मोटारीच्या स्टार्टरचे बटन दाबताच त्यांना विजेचा तीव्र धक्का बसला. ही गोष्ट लक्षात येताच छाया खाडे यांनी त्यांच्या दिशेने धाव घेतली. त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता दीपक यांना विजेच्या संपकार्तून दूर केले. यामुळे दीपक खाडे यांच्या जिवावरील संकट टळले. पण हे करताना छाया मात्र विजेच्या प्रवाहात अडकल्या.

## मुलुंडमधील मेट्रोचा खांब कोसळल्याच्या घटनेनंतर आदित्य ठाकरेंचा सरकारवर संताप

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १४ :**



मुंबईमधील वडाळा-ठाणे कासारवडवली मेट्रो ४ या मार्गिकेच्या कामाच्या दरम्यान मुंबई मेट्रोचं काम सुरू असताना मुलुंडजवळ शनिवार दुपारी मेट्रोच्या खांबाचा काँक्रीट स्लॅब उंचावरून खाली कोसळला. या घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून तिघे जखमी झाले आहेत.

जखमी झालेल्यांवर रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती सांगितली जात आहे. दरम्यान, या घटनेनंतर शिवसेना (ठाकरे) आमदार आदित्य ठाकरे यांनी एक्सवर पोस्ट शेअर करत भाजपाच्या सरकारवर जोरदार टीका केली आहे. भाजपाच्या राजवटीत जीवाची काहीच किंमत नाही असं म्हणत आदित्य ठाकरे यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे.

आज बांधकामाधीन मेट्रो ४ मार्गाचा काँक्रीट स्लॅब (पॅरापेट) उंचावरून खाली एका रिक्षा आणि एका कारवर कोसळला. याचप्रमाणे गेल्या वर्षी एक भिंत कोसळली होती आणि तत्कालीन नव्याने उद्घाटन झालेल्या मेट्रो मार्ग ३ मध्ये पावसाचे पाणी भरले होते. सरकार या कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकेल का? कदाचित नाही. कदाचित काही लाखांचा दंड दाखवेल आणि कंत्राटदाराला आणखी निविदा देईल, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली. तुमच्या लक्षात आलंच असेल की काम पूर्ण होण्यापूर्वीच खांब रंगवलेले आहेत. यासाठी राज्याला काही कोटींचा खर्च येतो. आता नंतर काम पूर्ण झाल्यावर तेच पुन्हा करण्यासाठी कोट्यवधी रुपये लागतील.

आजही बहुतेक पायाभूत सुविधांच्या कामांमध्ये खूप बॅरिकेडिंग आहेत, ज्यामुळे वाहतूक कोंडी होते किंवा वाहने उघड्या खड्डयात पडतात. भाजपा राजवटीत जीवनाचे काही मूल्य नाही. मेट्रो मार्गावरून पडणारे तुकडे, वाहतुकीचे असुरक्षित मार्ग, तासंतास मदतीशिवाय कार/बाईक खड्डयात पडणे, किती लाजिरवाणी गोष्ट आहे, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारवर केली आहे.

## आश्रमशाळेतील १०० विद्यार्थी जाणार इस्त्रोच्या सफरीवर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**

राज्यातील विविध आश्रम शाळेतील तब्बल १०० विद्यार्थी लवकच भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो)च्या सफरीवर जाणार आहेत. विज्ञान प्रेरणा अभियानात चांगली कामगिरी करणाऱ्या अशा विद्यार्थ्यांसाठी १५ ते २० फेब्रुवारी दरम्यान या सहलीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिली. ग्रामीण व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाविषयी जिज्ञासा, संशोधनाची वृत्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक आहे. आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात अंतराळ संशोधन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध असून त्या संधीं ग्रामीण विद्यार्थ्यांना प्राप्त होण्यासाठी सरकारने विशेष उपक्रम हाती घेतला असून या उपक्रमासाठी आश्रमशाळांमधून गुणवत्ता परीक्षेद्वारे १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांना इस्त्रो येथे भेट देऊन उपग्रह निर्मिती, प्रक्षेपण तंत्रज्ञान, प्रत्यक्ष रॉकेटचे प्रक्षेपण पाहणे आणि अंतराळ संशोधन प्रकल्पांविषयी प्रत्यक्ष माहिती घेण्याची संधी मिळणार आहे. तसेच विज्ञानविषयक कार्यशाळा आणि शास्त्रज्ञांशी संवादाच्या माध्यमातून त्यांना अनुभवाधारित शिक्षणाचा लाभ होणार आहे.

## खडसे दाम्पत्याविरुद्धचे अजामीनपात्र अटक वॉरंट रद्द

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १४ :**

**भोसरी जमीन घोटाळा प्रकरण**

पुण्यातील भोसरीस्थित जमीन खरेदी घोटाळाप्रकरणी माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) नेते एकनाथ खडसे हे पत्नी मंदाकिनी यांच्यासह शुक्रवारी विशेष न्यायालयात शुक्रवारी उपस्थित झाले. त्यामुळे विशेष न्यायालयाने त्यांच्याविरुद्ध बजावलेले अजामीनपात्र अटक वॉरंट रद्द केले.

आरोपनिश्चितीच्या प्रक्रियेसाठी उपस्थित राहण्याचे आदेश देऊनही खडसे दाम्पत्य मागील सुनावणीच्या वेळी न्यायालयात हजर झाले नाही. आरोप निश्चिती प्रक्रियेसाठी खडसे दांपत्याची उपस्थिती आवश्यक होती. तथापि, ते अनुपस्थित राहिल्याने खासदार/आमदार प्रकरणांसाठी स्थापन केलेल्या विशेष न्यायालयाचे न्यायाधीश महेश जाधव यांनी खडसे दाम्पत्याविरुद्ध अजामीनपात्र अटक वॉरंट बजावले होते. याविरुद्ध खडसे दाम्पत्याने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. परंतु विशेष न्यायालयासमोर उपस्थिती लावून अजामीनपात्र अटक वॉरंट रद्द करून घेण्याची सूचना न्यायालयाने केली होती. या पार्श्वभूमीवर, एकनाथ खडसे पत्नी मंदाकिनी यांच्यासह शुक्रवारी विशेष न्यायाधीशांसमोर हजर झाले. त्याची दखल घेऊन विशेष न्यायालयाने त्यांच्याविरुद्ध बजावलेले अजामीनपात्र अटक वॉरंट रद्द केले.

## अपार्टमेंटच्या आगीत १८ दुचाकींची राख

■ **वृत्तसंस्था, जळगाव, दि. १४ :**



शहरातील रामेश्वर कॉलनीत एका अपार्टमेंटच्या पार्किंगमध्ये शनिवारी पहाटे दोन वाजेच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीत तब्बल १८ दुचाकी जळून खाक झाल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली. या प्रकरणी औद्योगिक वसाहत पोलीस ठाण्यात नोंद घेण्याचे काम सुरू होते. आगीच्या घटनेमागील नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांनी पुढील तपासाला गती दिली आहे.

रामेश्वर कॉलनीतील साई गजानन रेसिडेन्सी ही बहुमजली सदनिका असून, त्याठिकाणी अनेक कुटुंबे वास्तव्यास आहेत. अपार्टमेंटच्या तळमजल्यावर वाहन पार्किंगची सोय करण्यात आली आहे. रहिवाशांनी नेहमीप्रमाणे आपल्या दुचाकी शुक्रवारी रात्री पार्किंगमध्ये उभ्या केल्या होत्या. दरम्यान, शनिवारी पहाटे दोन वाजेच्या सुमारास अचानक पार्किंग परिसरातून धूर आणि आगीच्या ज्वाळा उठू लागल्या. पहिल्या मजल्यावर राहणारा एक व्यक्ती लघुशंकेच्या निमित्ताने गॅलरीत आला असता, त्याला खाली धगधगती आग दिसली. दुचाकींनी पेट घेतल्याचे पाहून त्याने तत्काळ आरडाओरडा करून इमारतीतील इतर रहिवाशांना सावध केले.

## बसच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १४ :**

पुणे येथील नवले पूल परिसरात एका आराम बसने धडक दिल्याने दुचाकीस्वार महाविद्यालयीन तरुणाचा मृत्यू झाला. या अपघातात दुचाकीवरील त्याची मैत्रीण जखमी झाली आहे. ही घटना कात्रज बाह्यवळण मार्गावर घडली. नितीन जुनवणे (वय १९, रा. धायरी फाटा, सिंहगड रस्ता) असे मृत तरुणाचे नाव आहे. अपघातात जखमी झालेल्या नितीनच्या मैत्रिणीने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात याप्रकरणी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नितीन आणि त्याची मैत्रीण रात्री पावणेदहाच्या सुमारास नवले पूल परिसरातून कात्रजच्या दिशेने जात होते. त्यावेळी एका प्रवासी आराम बसने त्यांच्या दुचाकीला धडक दिली.

## महिला अधिकाऱ्याची लाखोंची फसवणूक

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १४ :**

गॅस पुरवठा खंडीत करण्याची भीती दाखवून सायबर चोरट्यांनी भारतीय आयुर्विमा महामंडळातील (एलआयसी) एका अधिकारी महिलेची सहा लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

याबाबत एका ५४ वर्षीय महिलेने शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला मॉडेल कॉलनीतील एका सोसायटीत राहायला आहेत. त्या भारतीय आयुर्विमा महमंडळात अधिकारी आहेत. २ फेब्रुवारी रोजी चोरट्यांनी महिलेच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. गॅस पुरवठा करणाऱ्या कंपनीतून बोलत असून, गॅस देयक थकीत आहे.

## मतमोजणीत घोळ

■ **वृत्तसंस्था, सिंधुदुर्ग, दि. १४ :**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील माटणे मतदारसंघातील एका मतदान केंद्रावर मतांच्या आकडेवारीत तफावत झाल्याचे समोर आले आहे. नोंदवलेल्या मतांची संख्या व मतदान यंत्रावरील मतदान झालेल्या मतांची संख्या यात तफावत आढळून आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी लक्ष्मण कसेकर यांनी संबंधित पाच कर्मचाऱ्यांना मतमोजणीच्या दिवशीचे कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. हा गंभीर प्रकार असून आपल्यावर कारवाई का करू नये, याचा खुलासा करण्याचे आदेश कसेकर यांनी दिले आहेत.

निवडणूक निर्णय अधिकारी लक्ष्मण कसेकर यांनी पाठवलेल्या नोटीशीत म्हटले आहे की, जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक 2026 नमूना व्हीएम-3 (नोंद झालेल्या मतांचा हिशेब) मध्ये अचूक नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. या नोटीसद्वारे आपणास कळवण्यात येते की, जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक 2026 (ता. दोडामार्ग) करिता केंद्र क्र. 50/14 माटणे मतदान केंद्रावर आपली नियुक्ती केली होती. 7 फेब्रुवारीला मतदान प्रक्रिया पार पडली. 9 फेब्रुवारीला मतमोजणीवेळी टेबल क्रमांक 6 व दुसऱ्या फेरीदरम्यान जेव्हा केंद्र क्रमांक 50/14 माटणे मतमोजणीकरिता आले तेव्हा नमूना व्हीएम- 3 (नोंद झालेल्या मतांचा हिशेब) मधील नोंद केलेल्या मतांची संख्या व मतदान यंत्रावरील मतदान झालेल्या मतांची संख्या यामध्ये तफावत आढळून आली.

ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून आपणाविरुद्ध लोकप्रतिनिधित्व अधिनियम 1951 चे कलम 134 तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 34 नुसार कारवाई का करू नये? याबाबतचा लेखी खुलासा नोटीस मिळताक्षणी माझे समक्ष सादर करावा; अन्यथा आपले काहीएक म्हणणे नाही, असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल. कारवाईबाबत वरिष्ठ निर्णय घेणार असून निवडणूक कामात हयगय केल्याप्रकरणी कारवाईची टांगती तलवार असलेल्या त्या पाच कर्मचाऱ्यांनी आपले म्हणणे लेखी स्वरूपात मांडले आहे.

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या हाती लागली मोदींची दुखरी नस

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १४ :**



अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे माकड केल्याची अत्यंत जहरी टीका वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या हाती पंतप्रधान मोदींची एखादी दुखरी नस लागली आहे. त्यामुळेच ते त्यांना आपल्या तालावर नाचवत आहेत, असे ते म्हणालेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्रातील रालोआ सरकारने अमेरिकेशी एक व्यापार करार केला आहे. विरोधकांनी या करारावर टीका करत या करारामुळे सरकारने भारतीय शेतकऱ्यांचे भवितव्य अमेरिकेच्या भरवशावर सोडल्याचा आरोप केला आहे. या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांनी पंतप्रधान मोदी व त्यांच्या सरकारवर सडकून टीका केली आहे. तसेच अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प पंतप्रधान मोदींना माकडासारखे आपल्या तालावर नाचवत असल्याचा आरोपही केला आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आपल्या देशाला पूर्णतः उद्ध्वस्त करत आहेत. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना माकड बनवून ठेवले आहे. मोदी ट्रम्प सांगतील तेच करतात. रशियाकडून तेल खरेदी करायचे नाही, तर करायचे नाही. भारतीय कृषी सेक्टर अमेरिकेसाठी उघडायचे, तर उघडले. आतापर्यंत टेक्स्टाईलवर टेरिफ2.5 टक्के होता. तो आता 18 टक्के झाला आहे. मोदी ही चांगली गोष्ट असल्याचा दावा करत आहेत. कदाचित पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची एखादी दुखरी नस डोनाल्ड ट्रम्प यांच्या हाती लागली आहे. त्यामुळेच ते त्यांना आपल्या तालावर नाचवत आहेत.

हे सर्व सार्वजनिक हिताचे विषय आहेत आणि या सर्व गोष्टी देशासाठी अपमानजनक आहेत. त्यामुळे विरोधी पक्षनेते राहुल गांधी व काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना पत्र लिहून मी विरोधी पक्षांची एक बैठक बोलावून या मुद्यावर देशव्यापी आंदोलन करण्याची मागणी केली आहे, असे ते म्हणाले.

## भाग्यश्री घुलेची आशियाई क्रीडा स्पर्धेच्या सराव शिबिरासाठी निवड



■ **वृत्तसंस्था,पुणे, दि. १४ :**

एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी क्रीडा अकादमीची खेळाडू भाग्यश्री घुले हिने नुकत्याच झालेल्या ४३व्या वरिष्ठ राष्ट्रीय रोइंग अजिंक्यपद स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. तिने एक सुवर्ण व एक रौप्य पदक पटकावले असून, या यशासह तिची आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीच्या राष्ट्रीय सराव शिबिरासाठी निवड झाली आहे.

ही स्पर्धा आर्मी रोइंग नोड येथे पार पडली. भाग्यश्रीची निवड कर्नाटकातील बेल्लारी येथे आयोजित राष्ट्रीय सराव शिबिरासाठी करण्यात आली आहे. जपानमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या तयारीसाठी हे शिबिर महत्त्वाचे ठरणार आहे. भाग्यश्री ही एमआयटी एडीटी शिक्षण संकुलातील माईर्स एमआयटी विश्वशांती गुरुकुलच्या कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. तिला विद्यापीठातील राष्ट्रीय रोइंग प्रशिक्षक संदीप भापकर यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

भाग्यश्रीच्या या उल्लेखनीय यशामुळे विद्यापीठाच्या क्रीडा क्षेत्रातील उज्ज्वल परंपरेत मानाची भर पडली आहे. एमआयटी एडीटी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ कराड, कार्याध्यक्ष तथा प्र.कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड, माईर्स शिक्षण संस्थेच्या सचिव डॉ. स्वाती चाटे-कराड, कुलगुरू डॉ. राजेश एस., कुलसचिव डॉ. महेश चोपडे, क्रीडा विभाग संचालक प्रा. पद्माकर फड, माईर्स एमआयटी गुरुकुलच्या प्रकल्प संचालक डॉ. ज्योती जोटवानी आणि एमआयटी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रिपल शर्मा यांनी भाग्यश्रीचे अभिनंदन केले आहे. तिच्या कामगिरीमुळे राज्यातील युवा खेळाडूंना निश्चितच प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## मयूर बागुल यांना स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १४ :**



महाराष्ट्र राज्य शासनाच्या मराठी भाषा विभाग यांच्यातर्फे सन २०२४ चे स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार जाहीर करण्यात आले असून, युवा लेखक मयूर बागुल यांना प्रतिष्ठेचा सन्मान जाहीर झाला आहे. त्यांच्या सर्जक या पुस्तकासाठी शेती व शेतीपूरक व्यवसाय विषयक उत्कृष्ट लेखनाबद्दल एक लाख रुपयांचा वसंतराव नाईक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

पुणे जिल्ह्यातील केसनंद येथील युवा लेखक मयूर बागुल यांनी ग्रामीण जीवन, शेतीतील नवकल्पना आणि शेतकऱ्यांच्या संघर्षमय वास्तवाचे प्रभावी चित्रण सर्जक या पुस्तकातून केले आहे. कृषी क्षेत्रातील पूरक व्यवसायांच्या नव्या संधींवर त्यांनी अभ्यासपूर्ण आणि प्रेरणादायी मांडणी केली आहे.

सर्जक हे पुस्तक चपराक प्रकाशन यांनी प्रकाशित केले असून, पुस्तक लेखनासाठी किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब तसेच सहज जलबोध अभियानाचे प्रणेते, वरिष्ठ भूजल वैज्ञानिक उपेंद्र दादा धोंडे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रकाशक श्री. घनश्याम पाटील व चपराक परिवारातील सदस्यांचे सहकार्यही मोलाचे ठरले.

या पुरस्कारामुळे महाराष्ट्रातील साहित्य व सामाजिक क्षेत्रात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे. राज्यातील विविध सामाजिक, शैक्षणिक व साहित्यिक संस्थांकडून मयूर बागुल यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ग्रामीण प्रश्नांवर ठोस आणि अभ्यासपूर्ण लेखन करणाऱ्या नव्या पिढीतील लेखक म्हणून मयूर बागुल यांचे नाव आता राज्यभरात चर्चेत आले असून, त्यांच्या या यशामुळे स्थानिक तरुणांना लेखन व संशोधन क्षेत्रात प्रेरणा मिळणार आहे.

## भाजप आमदार संजय केनेकर यांच्या कार्यालयात एअरगन

■ **वृत्तसंस्था, छत्रपती संभाजीनगर, दि. १४ :**

छत्रपती संभाजीनगरमध्ये आज सकाळी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला. भाजप आमदार संजय केनेकर यांच्या क्रांती चौकातील मध्यवस्तीत असलेल्या संपर्क कार्यालयात एका बॅगेत पिस्तुलासारखी वस्तू आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. काल सायंकाळी अज्ञात व्यक्तीने ही बॅग कार्यालयात ठेवून दिल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. सुरुवातीला कुणाची तरी बॅग विसरली असावी, असा समज करून कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी ती तशीच ठेवली. मात्र सकाळपर्यंत कुणीही त्या बॅगेबाबत संपर्क साधला नाही. त्यामुळे संशय आल्याने बॅग उघडून पाहिली असता त्यामध्ये पिस्तुल आढळल्याचे दिसून आले.

घटनेची माहिती मिळताच आमदार संजय केनेकर यांनी तत्काळ पोलिसांशी संपर्क साधून संपूर्ण प्रकार कळवला. पोलिसांनी तातडीने कार्यालयात धाव घेत बॅग आणि त्यातील वस्तू ताब्यात घेतली. प्राथमिक तपासात संबंधित पिस्तुल ही एअरगन असल्याचे स्पष्ट झाले आहे. तरीदेखील सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांनी या घटनेकडे गांभीयार्ने पाहिले आहे. एअरगन कार्यालयात कशी आणि केव्हा आणली गेली, ती कोणाची आहे आणि तिचा उद्देश काय असू शकतो, याचा तपास सुरू करण्यात आला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत वरिष्ठ अधिकारी पंकज अतुलकर घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आमदार संजय केनेकर यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून संपूर्ण घटनेची माहिती घेतली. कार्यालय परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्याचे काम सुरू झाले आहे.

## सुनेत्रा पवार यांचा जनता दरबारातून थेट संदेश

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १४ :**

बारामतीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आयोजित केलेल्या जनता दरबाराला मोठा प्रतिसाद मिळाला. सहयोग या निवासस्थानी झालेल्या या उपक्रमात नागरिकांनी विविध प्रश्न, तक्रारी आणि मागण्या थेट त्यांच्या समोर मांडल्या. अजित पवार यांच्या प्रमाणेच निवेदने स्वीकारत आणि लोकांचे म्हणणे शांतपणे ऐकत सुनेत्रा पवार पुढे सरसावल्या. जनतेशी थेट संवाद साधण्याच्या या उपक्रमामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दुवा अधिक मजबूत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



या जनता दरबारात बारामती आणि आसपासच्या भागातून नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. पाणीपुरवठा, रस्ते, शेती, शिक्षण, आरोग्य, स्थानिक पायाभूत सुविधा अशा अनेक विषयांवर तक्रारी मांडण्यात आल्या. काहींनी वैयक्तिक अडचणी मांडल्या, तर काहींनी सामूहिक मागण्या केल्या. सुनेत्रा पवार यांनी प्रत्येक अर्ज स्वीकारत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्याचे संकेत दिले. प्रशासनाने तत्काळ उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

जनतेशी थेट संवाद साधण्याची ही पद्धत बारामतीत नवीन नाही. माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्यकाळातही अशाच प्रकारे नागरिकांच्या तक्रारी ऐकून तत्काळ निर्णय घेण्याची पद्धत पाहायला मिळाली होती. त्याच धर्तीवर सुनेत्रा पवार यांनीही लोकांशी संवाद साधला. नागरिकांनी मांडलेल्या मुद्द्यांवर प्रशासनाशी समन्वय साधून लवकर निर्णय घेतले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, बारामती तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदाबाबतही चर्चांना उधाण आले आहे. या कारखान्याच्या चेअरमनपदी यापूर्वी अजित पवार कार्यरत होते. ते ब वर्ग गटातून निवडून आले होते. मात्र त्यांच्या जाण्याने ही जागा रिक्त झाली आहे.

त्यामुळे आता या पदावर कोणाची नियुक्ती होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. स्थानिक पातळीवर सुनेत्रा पवार या ब वर्ग गटातून उमेदवारी अर्ज भरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. माळेगाव सहकारी साखर कारखाना हा बारामती तालुक्यातील एक महत्त्वाचा उद्योग आहे. शेतकऱ्यांच्या ऊस उत्पादनाशी आणि स्थानिक अर्थव्यवस्थेशी या कारखान्याचा थेट संबंध आहे. त्यामुळे चेअरमनपदावर कोण विराजमान होणार, याला विशेष महत्त्व आहे. जर सुनेत्रा पवार यांनी उमेदवारी दाखल केली, तर त्याला राजकीयदृष्ट्याही मोठे महत्त्व प्राप्त होईल, अशी चर्चा रंगली आहे.

जनता दरबाराच्या माध्यमातून सुनेत्रा पवार यांनी एकीकडे जनतेशी संवाद साधला, तर दुसरीकडे त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीबाबतच्या चर्चांनाही चालना मिळाली. नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, असा त्यांचा स्पष्ट संदेश होता. त्यामुळे स्थानिक पातळीवर प्रशासन अधिक सक्रिय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एकूणच, बारामतीत झालेला हा जनता दरबार केवळ तक्रारी ऐकण्यापुरता मर्यादित राहिला नाही, तर त्यातून पुढील राजकीय घडामोर्डीची चाहूलही लागली आहे. माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदासाठी सुनेत्रा पवार मैदानात उतरणार का, याबाबत उत्सुकता वाढली आहे. जनतेशी थेट संपर्क आणि संघटनात्मक पातळीवरील हालचाली यामुळे बारामतीच्या राजकारणात नव्या घडामोडी घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.





# सुवर्णकाराजवळील 45 तोळे सोन्याची सशस्त्र लूट

## मोपेडने घरी जात असताना बालाजी नगर-कठोरा मार्गावर थरार

### विशेष पथके गठित, नाकाबंदी तीव्र

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 14 ) -** चाकूचा धाक दाखवून सराफा व्यावसायिकाजवळील 45 तोळे (459 ग्रॅम) सोन्याचे दागिने व 1 लाख 70 हजार रुपये रोख असा एकूण सुमारे 38 लाख 42 हजार रुपयांचा मुद्देमाल लुटारूंनी हिसकावून नेल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी रात्री बालाजी नगर ते कठोरा रोड परिसरात घडली. या घटनेमुळे शहरातील व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

माहितीनुसार, सुशांत मनोहर शेरेकर (वय 43, रा. बालाजी नगर, अमरावती) हे कठोरा रोडवरील रुग्णालयाजवळ 'सुमित्रा ज्वेलरी आर्ट' नावाचे दागिन्यांचे दुकान चालवतात. 13 फेब्रुवारी रोजी रात्री सुमारे 9.13 वाजता दुकान बंद करून त्यांनी 459 ग्रॅम सोन्याचे दागिने (अंदाजे किंमत 36 लाख 72 हजार रुपये) व 1 लाख 70 हजार रुपये रोख पिवळ्या कापडी पिशवीत ठेवले. त्यानंतर ते मोपेड (क्रमांक एमएच 27/बीडी 0692) वरून घरी निघाले.

दरम्यान, बालाजी नगरच्या फलकाजवळ मागून आलेल्या काळ्या रंगाच्या कारने त्यांना ओव्हरटेक करून रस्त्याच्या कडेला अडवले. कारमधून उतरलेल्या तीन अज्ञात इसमांनी शेरेकर यांना धक्का देत खाली पाडले. त्यानंतर चाकूचा धाक दाखवून धमकावत मोपेडची डिक्की उघडली आणि पिशवीतील दागिने व रोख रक्कम लुटली. लुटीनंतर आरोपी गुरुदेव नगरच्या दिशेने फरार झाले.

#### चेहेरे झाकलेले; फक्त डोळे दिसले

लूटीनंतर आरोपी कारमध्ये बसून पसार झाले. तिघांचेही चेहरे पूर्णपणे झाकलेले असल्याने स्ट्रीटलाइटच्या उजेडात शेरेकर यांना केवळ त्यांच्या डोळ्यांचे दर्शन झाल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून तपास पोलीस उपनिरीक्षक गजानन लोकडे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

#### सीसीटीव्ही फुटेज तपासणी सुरू

घटनेनंतर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण तसेच गाडगेनगर पोलीस ठाण्याचे पीआय अतुल वर यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिस आयुक्त राकेश ओला, पोलिस उपायुक्त व सहायक पोलिस आयुक्त यांनीही घटनास्थळी पाहणी करून तपासाबाबत दिशानिर्देश दिले. परिसरातील तसेच शहरातील प्रमुख चौकांवरील सीसीटीव्ही फुटेज जप्त करण्यात आले असून तपास सुरू आहे. शहरातील प्रमुख मार्गांवर नाकाबंदी करण्यात आली असून संशयित काळ्या कारचा शोध घेण्यासाठी विशेष पथके गठित करण्यात आली आहेत. आसपासच्या जिल्ह्यांनाही सतर्क करण्यात आले आहे.

#### यापूर्वीचा गुन्हा उकलला होता

गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत 2024 मध्ये अशीच घटना घडली होती. सराफा व्यावसायिक अरविंद जावरे व त्यांचे वडील उत्तम जावरे (दोन्ही रा. जवाहरनगर, रेखा कॉलनी) यांना मारहाण करून अज्ञात चोरट्यांनी 25 किलो चांदी लंपास केली होती. त्या प्रकरणात पोलिसांनी आरोपींना अटक केली होती. सद्य घटनेमुळे पोलिसांसमोर पुन्हा गुन्हेगारांचा शोध घेण्याचे आव्हान उभे ठाकले आहे.

# गोवंश तस्करीच्या वाहनाने शिक्षकाला चिरडले

## नवसारी टी-पॉईंटवरील भीषण अपघात ; जागीच मृत्यू







**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 14 ) -** शहरातील नवसारी टि-पाईन्टवर शनिवारी पहाटे सुमारे 6 वाजता गोवंश तस्करी करणाऱ्या भरधाव वाहनाने दुचाकीस्वार शिक्षकाला चिरडल्याची संतापजनक घटना घडली. या भीषण अपघातात शिक्षकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला असून शहरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. मृत शिक्षकाचे नाव अब्दुल साजिद अब्दुल मजीद (वय 46, रा. चपराशीपुरा, अमरावती) असे आहे.

अब्दुल साजिद हे अंजनगाव सुर्जी येथील हबीब नगर क्रमांक 2 मधील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत होते. नेहमीप्रमाणे शनिवारी पहाटे ते दुचाकीने शाळेकडे निघाले होते. दरम्यान, नवसारी टी-पॉईंटवर भरधाव वेगाने येणाऱ्या बोलेरो वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की शिक्षक अब्दुल साजिद यांना वाहनाने चिरडले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर काही काळ परिसरात वाहतूक ठप्प झाली होती. माहितीनुसार, संबंधित बोलेरो वाहनातून गोवंश तस्करी केली जात होती. दुचाकीला धडक दिल्यानंतर वाहन थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जाऊन आदळले. त्यामुळे वाहनाचा पुढील भाग पूर्णपणे चुराडा झाला. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेची माहिती मिळताच गाडगेनगर पोलिसांचा ताफा तात्काळ घटनास्थळी दाखल झाला. मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला. त्यानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली. पोलिसांनी बोलेरो चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. मात्र, भरधाव वेग, बेकायदेशीर गोवंश वाहतूक आणि निष्काळजीपणामुळे एका निष्पाप शिक्षकाचा बळी गेल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# अंजनगाव बारी-कोंडेश्वर मार्गाचे नुतनीकरण रखडले

### भाविकांमध्ये नाराजी व संभ्रम कायम





**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.14 )-** गेल्या काही वर्षांपासून नुतनीकरणाच्या प्रतीक्षेत असलेला अंजनगाव बारीङ्कोंडेश्वर मार्ग सध्या पूर्णत: निकामी अवस्थेत आहे. तीर्थक्षेत्र कोंडेश्वर संस्थानच्या विकासासाठी शासनामार्फत उपलब्ध झालेल्या 25 कोटी रुपयांच्या निधीत या मार्गाच्या नुतनीकरण व डांबरीकरणाचा स्पष्ट उल्लेख असूनही कामाला विलंब होत असल्याने नागरिक व भाविकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

#### निधी असूनही कामात विलंब

दि. 21 ऑगस्ट 2018 रोजी झालेल्या शिखर परिषदेत तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री प्रवीण पोटे यांच्या उपस्थितीत तीर्थक्षेत्र विकास निधीतून 25 कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते.

निधी उपलब्ध झाल्यानंतर विविध विकासकामांना सुरुवात झाली असली, तरी अंजनगाव बारी-कोंडेश्वर मार्गाचे नुतनीकरण अद्यापही पूर्णत्वास गेलेले नाही.

#### जि.प. बांधकाम विभागाकडून 1 कोटी मंजूर

कामातील विलंब लक्षात घेता आमदार रवि राणा यांनी जि.प. बांधकाम विभागाकडून 1 कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला. या निधीतून मार्गाच्या काँक्रीटीकरणासाठी नुकतेच (दि. 5) भूमिपूजनही करण्यात आले. मात्र, यामुळे नागरिकांमध्ये नवीन संभ्रम निर्माण झाला आहे.

#### महाशिवरात्रीपूर्वी दुरुस्तीची होती अपेक्षा

मार्गाची सद्यस्थिती अत्यंत खराब असून चालताना देखील नागरिकांना मोठी दक्षता घ्यावी लागत आहे. महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर शेकडो भाविक या मार्गाने ये-जा करतात. त्यामुळे यात्रेकरूंना होणाऱ्या संभाव्य अडचणी लक्षात घेता काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी होत आहे.

### तूर पिकाच्या ढिगाऱ्याला आग;

**अमरावती -** पथ्रोट पोलीस ठाणे हद्दीतील काकडा कुष्ठा रोडलगत असलेल्या शेत परिसरात तूर पिकाच्या ढिगाऱ्याला अज्ञात व्यक्तीने आग लावल्याची घटना 13 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली आहे. या आगीत सुमारे 1 लाख 50 हजार रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती आहे.

# रस्त्यावर मोबाईल हिसकावणाऱ्या अल्पवयीन टोळीचा पर्दाफाश

## पोलिसांचा सापळा यशस्वी; 9 मोबाईल जप्त, आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 14 ) -** शहरात गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या मोबाईल स्नॅचिंगच्या घटनांना अखेर आळा बसला आहे. रस्त्याने चालणाऱ्या नागरिकांच्या हातातील मोबाईल क्षणार्धात हिसकावून पळ काढणाऱ्या अल्पवयीन मुलांच्या टोळीला गाडगे नगर पोलीस ठाणे यांनी जेरबंद केले आहे. या कारवाईत 9 महागडे मोबाईल हस्तगत करण्यात आले असून, आणखी अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता तपासातून व्यक्त केली जात आहे. प्रकरणाची सुरुवात अशोक कॉलनी परिसरातील एका युवतीचा मोबाईल संध्याकाळी हिसकावून नेण्याच्या घटनेपासून झाली.

तक्रार दाखल होताच पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक माहिती आणि स्थानिक सूत्रांच्या मदतीने संशयितांचा मागोवा घेतला. तपासाची दिशा स्पष्ट होताच डीबी पथकाने सापळा रचून टोळीतील सदस्यांना ताब्यात घेतले. चौकशीत सर्व आरोपी अल्पवयीन असल्याचे समोर आले. शहरातील विविध भागांत त्यांनी अशाच पद्धतीने मोबाईल चोरण्याचे प्रकार केल्याचा संशय आहे. जप्त केलेल्या 9 मोबाईलची पडताळणी सुरू असून, चोरीस गेलेल्या इतर मोबाईलचा शोध घेण्यासाठी पोलिसांची मोहीम सुरू आहे. तक्रारदारांकडून ओळख परेड घेण्याची प्रक्रिया राबवली जाणार आहे. या कारवाईमुळे शहरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला असून, रात्रीच्या वेळी आणि गर्दीच्या ठिकाणी अधिक सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### विवाहिता महिलेला छळ; गुन्हा दाखल

**अमरावती -** गाडगेनगर पोलीस ठाणे हद्दीतील शिवार्पण कॉलनीत एका 27 वर्षीय विवाहिता महिलेचा सासरच्यांनी मानसिक व शारीरिक छळ केला. पिडित महिलेचा प्रेमविवाह झाला होता. विवाहानंतर सासरच्या मंडळींनी वाद घालत तिला वारंवार त्रास दिल्याचा आरोप पिडिताने 13 फेब्रुवारी रोजी दिलेल्या तक्रारीतून केला आहे. पीडितेने यापूर्वी भरोसा सेलमध्ये तक्रार केली होती. त्यानंतर पतीने तक्रार मागे घेण्याचा दबाव टाकत मारहाण केल्याचेही तिने नमूद केले आहे.

# जिल्ह्यातील विविध अपघातांत दोघांचा मृत्यू; तिघे जखमी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 14 )-** जिल्ह्यातील ग्रामीण भागात घडलेल्या तीन वेगवेगळ्या अपघातांत दोघांचा मृत्यू झाला असून तिघे जखमी झाले आहेत. हे अपघात लोणी, मंगरुळ दस्तगीर आणि शिरजगाव कसबा पोलीस ठाण्यांच्या हद्दीत घडले. संबंधित पोलीस ठाण्यांनी प्रत्येक प्रकरणी गुन्हे नोंदवून तपास सुरू केला आहे.

लोणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत चंद्रपूर जिल्ह्यातील भगवान दत्ता साळवे हे ट्रक क्रमांक एमएच 34/बीझेड 4104 ने भाडे घेऊन अमरावतीकडे येत होते. 12 फेब्रुवारी रोजी रात्री बडनेराङ्कबेलोरा मार्गावर त्यांनी ट्रक रस्त्याच्या कडेला उभा करून दोरी बांधत असताना अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. याप्रकरणी त्यांच्या जावई सचिन सुभाष कावडे यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

दुसरी घटना शिरजगाव कसबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत बहिरम-परतवाडा मार्गावर 1 फेब्रुवारी रोजी घडली. दोन दुचाकींच्या धडकेत जीवन पांडुरंग बेलसरे (वय 33, रा. जनुना, अकोट) यांचा घटनास्थळी मृत्यू झाला. ते पत्नी व मुलासह दुचाकीवरून जात असताना समोरून येणाऱ्या दुचाकीने त्यांच्या वाहनाला धडक दिली. या अपघातात पत्नी व मुलगा जखमी झाले. याप्रकरणी वडील पांडुरंग बेलसरे यांच्या तक्रारीवरून अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिसरी घटना धामणगाव रेल्वे तालुक्यातील रायपूर कासारखेड येथील सूरज रामभाऊ साठवणे (वय 30) यांच्याशी संबंधित आहे. ते पुलगावहून गावाकडे जात असताना औरंगाबादङ्कनागपूर महामार्गावर दुचाकी क्रमांक एमएच 27/एक्स 3344 ने समोरून धडक दिली. या अपघातात सूरज साठवणे गंभीर जखमी झाले असून त्यांच्या दोन्ही पायांना फ्रॅक्चर झाले आहे. या प्रकरणी मनोज साठवणे यांच्या तक्रारीवरून मंगरुळ दस्तगीर पोलीस तपास करत आहेत. ग्रामीण भागातील सलग अपघातांच्या घटनांमुळे रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. स्थानिक पोलीस प्रशासनाने नागरिकांना वाहन चालविताना अधिक सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

# भुलेश्वरी नदीवरील पुलावरून पडून युवकाचा दुर्दैवी मृत्यू

- चिंचोली शिंगणे येथील घटना
- खल्लार पोलिसांचा तपास सुरू

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि. 14 )** तालुक्यातील चिंचोली शिंगणे येथील 27 वर्षीय युवकाचा भुलेश्वरी नदीच्या पुलावरून पडून जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी (दि. 13) सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मृत युवकाचे नाव विशाल प्रेमदास तायडे (वय 27, रा. चिंचोली शिंगणे) असे आहे. प्राथमिक माहितीनुसार, त्याला मद्यपानाचे व्यसन होते. गुरुवारी (दि. 12) रात्री तो अंजनगाव रोडवरील चिंचोली फाट्यानजीक असलेल्या भुलेश्वरी नदीच्या सुमारे 30 फूट उंच पुलावरून जात असताना त्याचा तोल जाऊन तो नदीपात्रात कोसळला. यात त्याचा जागीच मृत्यू झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. शुक्रवारी सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली. माहिती मिळताच खल्लार पोलीस स्टेशन येथील ठाणेदार रवींद्र बारड यांच्यासह पोलिस पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह पुढील प्रक्रियेसाठी पाठविला.

# मेळघाटच्या विकासासाठी आरोग्य व आर्थिक सक्षमीकरणाला प्राधान्य

### जिल्हाधिकारी आशिष येरेकर



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 14 ) -** मेळघाटच्या सर्वांगीण विकासासाठी आरोग्य सेवा सक्षम करणे आणि स्थानिकांचे आर्थिक सक्षमीकरण साधणे यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी स्पष्ट केले. महसूल भवन येथे आयोजित आरोग्य आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्र, डॉ. विभावरी दाणी, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

मेळघाट परिक्रमा उपक्रमांतर्गत सेवा देणाऱ्या खाजगी डॉक्टरांना आवश्यक औषधसाठा, वाहन व निवास सुविधा जिल्हा प्रशासनाकडून उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. आरोग्यविषयक जनजागृतीसाठी शिवाजी सायन्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा सहभाग राहणार असून, कोरकू भाषेत पथनाट्य व संवादसत्रे आयोजित केली जातील.

कृषी क्षेत्रात कुटकी, सावा यांसारख्या मिलेट्सबाबत जनजागृती, लागवडीखालील क्षेत्रवाढ तसेच मशरूम प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचे निर्देश देण्यात आले. प्राथमिक कृषी सहकारी संस्थांच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी विशेष उपक्रम हाती घेण्यावर भर देण्यात आला. मोहफुलांच्या हंगामाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक नेट सामग्री उपलब्ध करण्याचे निर्देशही देण्यात आले. विद्युत पुरवठा अखंडित ठेवण्याबाबत संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या.

# 32 नागरिकांच्या तक्रारी थेट आयुक्तांसमोर

## पोलीस आयुक्त कार्यालयात तक्रार निवारण शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

### तातडीच्या कारवाईच्या सूचना





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 14 ) -** सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी थेट ऐकून त्यांचे त्वरित निरसन करण्याच्या उद्देशाने अमरावती शहर पोलिस आयुक्तालयात आयोजित तक्रार निवारण शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शनिवार, 14 फेब्रुवारी रोजी दुपारी 3.00 ते 5.00 या वेळेत पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी स्वत: उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या ऐकल्या.

महाराष्ट्र पोलिसांतर्गत हा उपक्रम 7 फेब्रुवारी 2026 पासून सुरू करण्यात आला असून, नागरिकांना थेट पोलीस आयुक्तांसमोर तक्रारी मांडण्याची संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्था, गुन्हेगारी, वाहतूक, फसवणूक तसेच इतर विविध विषयांवरील तक्रारी नागरिकांनी मांडल्या. या शिबिरात एकूण 32 नागरिकांच्या तक्रारी प्रत्यक्ष ऐकून घेण्यात आल्या. संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत प्रत्येक प्रकरणाची नोंद करण्यात आली व त्वरित कारवाईसाठी आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. काही प्रकरणांवर तातडीने कार्यवाही सुरू करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती देण्यात आली. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली असून, पोलीस प्रशासनाबद्दल विश्वास अधिक दृढ होत असल्याचे चित्र दिसून आले. तक्रारींसाठी वारंवार कार्यालयीन दार ठोठावण्याची गरज न पडता, थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत आवाज पोहोचण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. जनसंपर्क विभागामार्फत पुढील काळातही असे तक्रार निवारण शिबिर नियमितपणे आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. नागरिकांनी आपल्या समस्या मोकळेपणाने मांडाव्यात आणि या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# एपस्टिनच्या फाईलमुळे जग हादरले!

जगाच्या पाठीवर काळे धंदे करायचे जर असेल तर आज पर्यंत फक्त ड्रग्सचे नाव घेतले जात होते. परंतु जगच बदलले तर आपण तरी काय करणार? परंतु एपस्टिनच्या फाईलच्या निमित्ताने जग भलत्याच दिशेने चालले आहे हे आता स्पष्ट झाले. बाल-लैंगिक गुन्हेगार जेफ्री एपस्टिनने एक भयंकर षडयंत्र रचले होते. त्याने एक रेड रुम पॅरिसमधील त्याच्या एका घरात उभारली होती. तेथेच त्याने त्याची काळी कृत्ये करायला सुरुवात केली होती. पण अशा विकृत माणसाच्या कृत्यावर आपल्या देशाने 'रिॲक्ट' व्हावे की न व्हावे हा एक प्रश्न आहे. परंतु अशा अविश्वासू माणसाच्या फाईलवर विश्वास ठेवून आपण आपल्याच देशातील लोकांना बदनाम का करावे? विरोधी पक्षाने संसदेत सध्या तरी त्याच मुद्द्याला धरून राजकारण सुरू केले आहे. जेफ्री एपस्टिनच्या फाईलने अख्खं जग हादरलं. जग हादरतांनाच त्याचे झटके भारतासारख्या आपल्या देशालाही बसले. या फाईल्समध्ये जगभरातील बड्या हस्तींचं नाव आलं आहे. त्यात भारतातील पाच बड्या हस्तींची नावे असल्याची चर्चा सुरू आहे. जेफ्री एपस्टिन हा जगातील बड्या हस्तींना तरुणी पुरवायचं काम करायचा. त्यात उद्योगपती, राजकारणी, एवढंच नव्हे तर काही देशांचे प्रमुखही होते. या फाईल्स ओपन होताच जगात एकच खळबळ उडाली आहे. अनेक ठिकाणी तर राजीनाम्यांची मागणीही होत आहे. काही ठिकाणी तर राजीनामे देण्यास सुरुवात झाली आहे. जेफ्री एपस्टिनने हे कारनामे करण्यासाठी एक आयलँड तयार केलं होतं. तिथे त्याच्या रेड रुममध्ये हे काळेधंदे चालायचे. जेफ्री एपस्टाईनच्या अत्यंत धोकादायक अशा रेड रूमचा पदार्फाश झाला आहे. त्याने आपल्या विकृत कामांसाठी रेड रूम तयार केली होती. या खोलीत स्त्रिया एपस्टिनच्या श्रीमंत पाहुण्यांसाठी खासगी नृत्य सादर करायच्या आणि अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जायचे. एपस्टीन फाईल्स मध्ये नेमक काय आहे आणि ते किती घृणास्पद आहे हे सगळ्यांना आतापर्यंत समजले आहे. त्यातले अनेक किळसवाणे तपशील उगाळणे सुद्धा लाजिरवाणे वाटत आहे. म्हणूनच त्याच्या कृत्याला आपल्या देशाने तरी अव्हेरले पाहिजे असे वाटते. अर्थात या प्रकरणाची व्याप्ती त्या पलीकडे गेली आहे. फक्त पैसे असलेले उद्योगपती या जाळ्यात अडकलेले असते तर कायद्याने त्यांना शिक्षा झाली असती. पण वेगवेगळ्या देशांचे राजदूत, नेते, अधिकारी, सरकारमध्ये सहभागी असणारे नेते, राष्ट्रप्रमुख, प्रभावशाली व्यक्ती जेव्हा या मध्ये अडकलेले दिसतात तेव्हा हे प्रकरण फक्त लैंगिक गुन्हे एवढ्या पुरतच मर्यादित राहात नाही. जेव्हा लैंगिक गुन्हे करताना आपले फोटो, व्हिडीओ निघालेत हे समजल्यावर आणि त्यावरून त्यांना ब्लॅकमेल केल्यावर या राजकारणी लोकांनी नेमक्या काय काय भानगडी करून बसले हे लक्षात येते. व्यापारी करार असोत, एखाद्या कंपनीला देशातली नैसर्गिक संपत्ती, खनिज ओरबाडून घेण्यासाठी दिलेली परवानगी असो, या सगळ्या गोष्टी एक प्रकारे गुन्ह्याशी संबंधितच असतात. प्रभावशाली लोक देशातल्या लोकांच्या मतांवर प्रभाव टाकतात, राजकारणी लोक धोरणात्मक निर्णय घेऊन देश कुणाच्या तरी दावणीला बांधतात, तेव्हा आपल्या लैंगिक गुन्ह्यांना लपवण्यासाठीवट ते लोक कोणत्याही थराला जाऊ शकतात. या फाईल्सच्या माध्यमातून जगातले प्रभावशाली लोक आणि राजकीय नेते ज्या पद्धतीने वाकवले गेलेले आहेत ते पाहता संपूर्ण जगावर बहुराष्ट्रीय कंपन्या राज्य करतात आणि आपण या कंपन्यांच्या उत्पादनांचे ग्राहक आणि त्याचा प्रयोग केले जाणारे गुलाम आहोत ही जाणीव हतबल करणारी आहे!

जेफ्री एपस्टीनची सर्व कागदपत्रं लवकरच जाहीर होतील, असे कळते. या कागदपत्रांमध्ये फोटो, व्हीडिओ आणि तपासाची माहिती मिळेल. या पहिल्या फाईल्समध्ये अनेक मोठ्या आणि प्रसिद्ध लोकांची नावं आहेत. ज्यात अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन, अँड्र्यू माउंटबॅटन-विंडसर आणि संगीतकार मिक जॅगर व मायकेल जॅक्सन यांचा समावेश आहे.

फाईल्समध्ये नाव असणं किंवा फोटो असणे म्हणजे त्या लोकांनी चुकीचं काम केलं आहे, असंही नाही. कदाचित आपल्या देशातील जी पाच नावे त्यात आलेली आहे त्यांच्या बाबतीत असेच असू शकेल. अनेकांनी, म्हणजे ज्यांची नावं एपस्टीन फाईल्समध्ये किंवा पूर्वीच्या दस्तऐवजांमध्ये आले आहे, त्यांनी कोणतंही चुकीचं काम केल्याचं नाकारलं आहे.

जगभरातल्या वेगवेगळ्या देशातल्या नागरिकांचे स्वातंत्र्य, स्वच्छ हवा, पाणी, शिक्षण, रोजगार, आरोग्य, चांगले पर्यावरण आणि निसर्गसंपन्न वसुंधरा हे मुलभूत हक्क या लोकांनी स्वतःच्या लैंगिक हव्यासापोटी धनदांडग्या कंपन्यांना विकलेले आहेत हेच या फाईल्सचे खरे सत्य आहे.

या लोकांनी केलेले लैंगिक गुन्हे अतिकठोर शिक्षेला जसे पात्र आहेत, तसेच देश विकण्याचे मानवतेला काळिमा फासणारे गुन्हेही तितक्याच कठोर शिक्षेला पात्र आहेत. एपस्टिनसारखा नीच, विकृत आणि आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी नेटवर्कशी जोडलेला माणूस जर भारताच्या पंतप्रधानाचं नाव घेतो, ही गोष्टच देशासाठी लाजिरवाणी आहे.

प्रश्न हा नाही की ते नाव का घेतलं



गेलं; प्रश्न हा आहे की जगाच्या नजरेत भारताची प्रतिमा कुठे नेऊन ठेवली गेली. आज भारताची ओळख संस्कृती, लोकशाही आणि नैतिक मूल्यांमुळे व्हायला हवी होती.

थर्ड अम्पायर
जयंत महाजन
94206 91420

पण जर आंतरराष्ट्रीय स्तरावर बदनाम झालेल्या व्यक्तीच्या संदर्भात आपल्या पंतप्रधानाचं नाव चर्चेत येत असेल, तर ते केवळ व्यक्तीवर नाही तर संपूर्ण देशावर पडलेलं सावट आहे. ज्या देशाचा पंतप्रधान नैतिकतेचा, चारित्र्याचा आणि शुचितेचा आदर्श असायला हवा, त्या देशाचं नाव एपस्टिनसारख्या प्रकरणात ओढलं जाणं ही अत्यंत गंभीर बाब आहे.

हे प्रकरण केवळ राजकीय नाही; हे भारताची जागतिक प्रतिमा, विश्वासार्हता आणि नैतिक अधिष्ठानाशी संबंधित आहे. इथे प्रश्न विचारणं गरजेचं आहे.

अशा संदर्भावर सरकारकडून स्पष्टता का नाही? मौन का पाळलं जातंय? जनतेला सत्य जाणून घेण्याचा अधिकार नाही का? एपस्टिनसारख्या नीच व्यक्तीच्या तोंडून भारताच्या पंतप्रधानाचं नाव येणं म्हणजे देशाच्या प्रतिष्ठेवर डाग लागणं आहे. तो डाग झाकण्यासाठी इतिहास, भावना किंवा वाद पुढे करून चालणार नाहीत.

देश व्यक्तीपेक्षा मोठा असतो आणि देशाची प्रतिमा जपणं ही सत्तेची पहिली जबाबदारी असते. एपस्टिन फाईल्ससारखा गंभीर आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर हादरवणारा मुद्दा समोर आला की, देशात अचानक भावनिक राष्ट्रवाद आणि इतिहासाचे वाद पुढे आणले जातात. हा निव्वळ योगायोग नाही, ही आखीव-रेखीव राजकीय रणनीती आहे.

नरेंद्र मोदींचं राजकारण प्रश्नांची उत्तरं देण्यात नाही, तर प्रश्नच बदलण्यात आहे. महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, लोकशाहीची गळचेपी आणि आता एपस्टिन फाईल्स या सगळ्यावर चर्चा टाळायची असेल तर एखादा भावनिक मुद्दा फेकायचा आणि जनतेचं लक्ष दुसरीकडे वळवायचं, हीच पद्धत वर्षानुवर्षे वापरली जाते आहे. देश चालवायचा असतो जबाबदारीने, नाटकबाजीने नाही. इतिहासाचा वापर आजच्या प्रश्नांपासून पळ काढण्यासाठी करणं म्हणजे जनतेच्या बुद्धिमत्तेचा अपमान आहे.

भावनिक वादांच्या जाळ्यात अडकायला नको आहे. कोण सामील आहे? कोण गप्प आहे? आणि कोणाला वाचवलं जातंय? असे प्रश्न विचारणं देशद्रोह नाही आणि दिशाभूल करणं देशभक्ती नाही.

यासंदर्भात अनेकांना कसलीही माहिती नाही. तथापि, 'काहीतरी घोटाळा दिसतोय ग' या गाण्याप्रमाणे अफवांना उधाण आले आहे. त्याचे निराकरण सरकारनेच करावे, अशी अपेक्षा करायला हरकत नाही!

### निदान देशाच्या प्रमुखांची बदनामी होऊ नये

राहुल गांधींनी एपस्टिन फाईलबद्दल मोदी सरकारवर आरोपाच्या फैरी झाडण्यास सुरुवात केली. यामुळे अस्वस्थ होऊन संसदीय व्यवहार मंत्री किरण रिजीजू उभे राहिले व राहुल गांधी आता संसदेत जे आरोप करत आहेत त्याचे त्यांना प्रमाणीकरण, सत्यापन करावे, अशी मागणी केली होती. राहुल गांधींनी लगेच हे आव्हान स्विकारलं, पण बरं झालं सभापतींनी ते सर्वच प्रकरण झिडकारले. अन्यथा देशाची लाज सभागृहाच्या पुढे उघड झाली असती. नव्याने प्रसिद्ध झालेल्या फाईल्समध्ये सर्वाधिक सेलिब्रिटींच्या नावांचा समावेश आहे. यापूर्वी जाहीर झालेल्या नावांपेक्षा हे प्रमाण जास्त आहे. एपस्टीन फायनान्स, मनोरंजन, राजकारण आणि व्यवसाय क्षेत्रातील अनेक लोकांशी जोडलेला होता. त्यांचे फोटो कुठे, कधी घेतले गेले किंवा कोणत्या प्रसंगाचे आहेत, हे स्पष्ट नाही. हेही अस्पष्ट आहे की, एपस्टीनचे या सर्व लोकांशी संबंध होते की, तो त्या कार्यक्रमांना उपस्थित होता. आधी जाहीर केलेल्या एपस्टीन इस्टेटमधील फोटोंमध्ये असेही फोटो होते, जे त्याने काढलेले नव्हते किंवा तिथे तो उपस्थित नव्हता. त्यामुळे जगभर वादळ उठले असले तरी आपल्या देशातील विरोधी पक्षाने हे प्रकरण जरा संयमाने हाताळले पाहिजे. राहुल गांधी यांनी संसदेत ज्या पद्धतीने भूमिका मांडायला सुरुवात केली होती, त्यावरून सत्ताधारी बॅकफुटवर गेले ही वस्तुस्थिती आहे. परंतु राहुल गांधींनी देखील संयमी भूमिका घेतल्याचे जाणवते.

# महाशिवरात्री व्रत

महाशिवरात्र हे भगवान शिवाचे व्रत आहे .भगवान शिव रात्रीच्या एका प्रहरी विश्रांती घेतात, त्या प्रहराला म्हणजे शंकराच्या विश्रांती घेण्याच्या काळाला 'महाशिवरात्र' असे म्हणतात. महाशिवरात्र हे व्रत माघ कृष्ण चतुर्दशी या तिथीला करतात. यावर्षी महाशिवरात्र 15 फेब्रुवारी 2026 या दिवशी आहे.



**महाशिवरात्री व्रताचे महत्त्व**

भगवान शिव रात्रीच्या एका प्रहरी विश्रांती घेतात, तो काळ पृथ्वीवर वषार्तून एकदा महाशिवरात्र म्हणून साजरा केला जातो. कारण पृथ्वीवरील एक वर्ष म्हणजे स्वर्गलोकातील एक दिवस. पृथ्वी जड (स्थूल) असल्यामुळे तिची गती कमी आहे आणि देवता सूक्ष्म असल्यामुळे त्यांची गती जास्त असते, त्यामुळे पृथ्वी आणि देवता यांच्या ब्रम्हांडातील कालमानात अंतर आहे.

**महाशिवरात्रीच्या दिवशी शिवाच्या उपासने मागील शास्त्र**

शिवाच्या विश्रांतीच्या वेळी शिव ध्यानावस्थेतून समाधी अवस्थेमध्ये जातात. शिवाची समाधी अवस्था म्हणजे शिवाने स्वतःसाठी साधना करण्याचा काळ .त्यामुळे ब्रम्हांडातील तमोगुण किंवा हलाहल त्यावेळी शिवतत्व स्वीकारत नाही. त्यामुळे ब्रम्हांडामध्ये हलाहलाचे प्रमाण प्रचंड वाढते किंवा वाईट शक्तींचा प्रचंड दाब वाढतो.

त्याचा परिणाम आपल्यावर होऊ नये म्हणून जास्तीत जास्त शिवतत्व आकृष्ट करणारे बिल्वपत्रे ,पांढरी फुले, रुद्राक्षांच्या माळा इत्यादी शिवपिंडीवर अर्पण करून वातावरणातील शिवतत्व आकृष्ट केले जाते. त्यामुळे वाईट शक्तींच्या वाढलेल्या दाबाचा परिणाम काही प्रमाणात कमी होतो.

**महाशिवरात्रीचे व्रत कसे करावे?**

महाशिवरात्री व्रताचे दोन प्रकार आहेत. काम्य आणि नैमित्तिक. उपवास, पूजा आणि जागरण हे महाशिवरात्र व्रताची तीन अंगे आहेत. माघ कृष्ण त्रयोदशीला एकभक्त राहावे. चतुर्दशीच्या दिवशी सकाळी महाशिवरात्री व्रताचा संकल्प करावा. सायंकाळी स्नान करून भस्म आणि रुद्राक्ष धारण करावे.

प्रदोष काळी शिवाच्या देवळात जावे. शिवाचे ध्यान करावे, मग षोडोशोपचार पूजा करावी. भवभवानी प्रित्यर्थ तर्पण करावे. शिवाला 108 कमळे किंवा 108 बेलाची पाने मंत्रजप करीत वहावीत. मग पुष्पांजली अर्पण करून अर्घ्य द्यावा .पूजा समर्पण, स्तोत्रपाठ आणि मूलमंत्राचा जप झाल्यावर शिवाच्या मस्तकावरील एक फुल काढून ते स्वतःच्या मस्तकावर ठेवावे आणि क्षमा याचना करावी.

**महाशिवरात्रीला रात्री करावयाची याम पूजा**

महाशिवरात्रीला रात्रीच्या चार प्रहरी चार पूजा कराव्यात असे विधान आहे. त्यांना यामपुजा म्हणतात. प्रत्येक यामपुजेत देवाला अभ्यंग स्नान घालावे. अनुलेपन करावे. तसेच धोत्रा, आंबा आणि बेल यांची पत्री वहावी. तांदळाच्या पिठाचे 26 दिवे करून त्यांनी देवाला ओवाळावे. पूजेच्या शेवटी 108 दिवे दान द्यावेत.

प्रत्येक पूजेतील मंत्र वेगवेगळे असतात त्या मंत्रांना अर्ध द्यावे. नृत्य, गीत, कथाश्रवण इत्यादी गोष्टींनी जागरण करावे. पहाटे स्नान करून पुनश्च शिवपूजा करावी. पारण्याला ब्राह्मण भोजन घालावे, आशीर्वाद घेऊन व्रत समाप्ती करावी. हे व्रत बारा, चौदा किंवा चोवीस वर्षे केल्यावर त्याचे उद्यापन करावे.

**शिवाचा पूजा विधि**

**शिवपिंडीवर अभिषेक करणे**

भगवान शिवाला शक्यतो दुधाचा अभिषेक करावा. कारण दुधामध्ये शिवाचे तत्व आकर्षित करण्याची क्षमता अधिक असल्याने दुधाच्या अभिषेकाच्या माध्यमातून शिवाचे तत्व लवकर जागृत होते. त्यानंतर ते दूध तीर्थ म्हणून प्राशन केल्याने त्या व्यक्तीला शिवतत्त्वाचा अधिक लाभ होतो.

दूध हे शक्तीचे प्रतीक असल्याने त्याचा अभिषेक शिवपिंडीवर केला जातो हे त्यामागचे अध्यात्म शास्त्र आहे. असे केल्याने त्याचा अध्यात्मिक लाभ होतो.

**शिवपिंडीला हळदीकुंकू ऐवजी भस्म लावावे**

हळद -कुंकू उत्पत्तीचे प्रतीक आहे, म्हणून लयाची देवता असलेल्या शिवाला हळद- कुंकू वाहू नये. देवाची पूजा म्हणून यज्ञात आहुती दिलेले तूप, समिधा इतर वनस्पती इत्यादी जाळल्यावर जे अवशेष राहतात त्याला भस्म म्हणतात.

भस्म हे विशेषतः शिवाशी संबंधित आहे. कारण भगवान शिव सर्वांगाला भस्म लावतो. शिवभक्त आपल्या भालप्रदेशावर भस्माने त्रिपुंडाकृती काढतात .कधीकधी लाल रंगाचा टिळाही या त्रिपुंडाच्या मध्यभागी काढतात. तो टिळा शिवभक्ताचे प्रतीक मानला जातो.

**शिवाला पांढऱ्या अक्षता वाहने**

अक्षता म्हणजे धुतलेले अखंड तांदूळ. या अक्षता मध्ये निर्गुण ईश्वरी तत्त्वाशी संबंधित उच्च देवतांच्या लहरी आकर्षित होतात. निर्गुणांशी संबंधित असल्याला शिवाला पांढऱ्या अक्षता वाहाव्या.

**शिवाला बेल कसा वहावा ?**

शिवाला त्रिदल बेल अत्यंत प्रिय आहे. म्हणजे जो, आपले सत्व, रज आणि तम हे तिनही गुण शिवाला अर्पण करतो, त्याच्यावर शिव संतुष्ट होतो. बेलाची पाने तारक शिवतत्त्वाची वाहक आहेत तर बेलाच्या पानांचे देठ स्मारक शिवतत्त्वाचे वाहक आहे.

बेलाच्या पानाचे देठ पिंडीकडे आणि अग्र (टोक) आपल्याकडे करून बेल वाहिल्यास तेव्हा अग्रा वाटे शिवतत्व वातावरणात अधिक प्रमाणात पसरते . याउलट बेलाच्या पानाचे देठ आपल्याकडे आणि टोक पिंडीकडे करून जेव्हा बेल वाहतो तेव्हा त्याचा लाभ केवळ बेलपत्र वाहणाऱ्यालाच होतो. बेलाचे पान शिवपिंडीवर उपडे वाहल्यावर त्यातून निर्गुण स्तरावरील स्पंदने अधिक प्रक्षेपित होतात म्हणून बेल उपडा वाहावा.

**उदबत्ती आणि अत्तर असावे**

शिवाला केवडा, चमेली किंवा हिना या शिवाला प्रिय असणाऱ्या गंधाच्या उदबत्तीने तीन वेळा ओवाळावे. आणि केवड्याचे उत्तर वापरावे.

**ॐ नमः शिवाय मंत्राचा जप**

महाशिवरात्र या दिवशी शिवतत्व नेहमीपेक्षा हजार पटीने कार्यरत असते. भगवान शिवाची भावपूर्णरीत्या पूजा करण्यासोबतच ॐनमः शिवाय हा नाम जप जास्तीत जास्त केल्याने जास्त शिवतत्व ग्रहण करता येते व त्याची कृपा प्राप्त होते.

**देवळात शिवपिंडीचे दर्शन**

महाशिवरात्रीला मंदिरात जाऊन शिवदर्शन घ्यावे. शिवाच्या पिंडीतून प्रक्षेपित होणारे तेज हे सर्वसामान्य पूजकाला पेलवणारे नसते. त्यामुळे शिवपिंडीचे दर्शन घेताना ते नंदीच्या दोन्ही शिंगातून घ्यावे असे शास्त्र आहे. नंदीच्या बाजूला उभे राहून डावा हात नंदीच्या वृषणावर ठेवावा, उजव्या हाताची तर्जनी (अंगठ्या जवळचे बोट) आणि अंगठा नंदीच्या दोन शिंगावर ठेवावा. दोन्ही शिंगे आणि त्यावर ठेवलेली दोन बोटे यांच्यामधील पोकळीतून शिवलिंग न्याहाळावे. वरील मुद्रेमुळे शिवाच्या पिंडीतून येणारा शक्तीचा स्त्रोत अधिक प्रमाणात कार्य करतो.

**शिवपिंडीला अर्ध प्रदक्षिणा**

शिवाची प्रदक्षणा चंद्रकोरी प्रमाणे म्हणजे सोमसुत्री असते. शाळुंके पासून उत्तर दिशेकडे म्हणजेच सोमच्या दिशेकडे ,मंदिराच्या विस्ताराच्या कडेपर्यंत जे सूत्र, म्हणजे नाला जातो त्याला सोम सूत्र म्हणतात. शिवाच्या पिंडीला प्रदक्षिणा घालताना शिवपिंडीच्या समोर उभे राहिल्यावर, उजवीकडे अभिषेकाच्या पाण्याची पन्हाळी (साळुंकेचा पुढे नेलेला स्त्रोत) असते.

प्रदक्षिणेचा मार्ग शिवाच्या समोर उभे राहिल्यास, तेथून चालू होऊन घड्याळाच्या दिशेने प्रदक्षिणा घालत पन्हाळीच्या पलीकडच्या कडेपर्यंत जावे, मग पन्हाळी न ओलांडता परत फिरून येऊन शिवपिंडीच्या समोर उभे राहावे. अशी एक प्रदक्षिणा पूर्ण करावी. साळुंकेच्या स्त्रोतातून शक्ती बाहेर पडत असते त्याचा सर्वसाधारण भाविकाला त्रास होऊ शकतो, म्हणून शिवपिंडीला अर्ध- प्रदक्षिणा घालतात. स्वयंभू किंवा घरातील लिंगास हा नियम लागू नाही.

भगवान शिवाने स्वतः भक्तांना आशीर्वचन दिले आहे, जे महाशिवरात्रीला माझे व्रत करतील त्यांच्यावर माझी कृपादृष्टी होईल. पुरुषांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतील. कुमारिकांना मनासारखा वर मिळेल. आणि विवाहित स्त्रियांचे सौभाग्य टिकेल. मनोभावे हे व्रत करूया आणि शिवकृपा प्राप्त करूया.

------------

■ सौ. माधवी पत्की
नागपूर.

■ ■ ■

# राष्ट्रवादीत पवारांविना वर्चस्वाची सुंदोपसुंदी!



महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धगधगता निखारा, जनसामान्यांचे 'दादा' आणि सत्तेच्या पटावरील सर्वात चाणाक्ष खेळाडू अजित पवार यांच्या अकाली आणि दुर्दैवी निधनाने केवळ राष्ट्रवादी काँग्रेसवरच नव्हे, तर संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे.

मात्र, या धक्क्यातून सावरण्यापूर्वीच मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरून सुरू होणाऱ्या सत्तेच्या राजकारणाने आता विद्रूप वळण घेतले आहे.

अजितदादांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याऐवजी, ती पोकळी स्वतःच्या महत्त्वाकांक्षेने व्यापण्यासाठी पक्षांतर्गत 'षडयंत्रांचा' जो खेळ सुरू झाला आहे, तो पाहिला की एकच म्हण आठवते– घर फिरले की घराचे वासेही फिरू लागतात.

अजितदादांच्या हयातीत पक्षावर त्यांची एकहाती पकड होती. त्यांचा शब्द हीच पूर्व दिशा होती. पण आज त्यांच्या अनुपस्थितीत 'पक्षाचा वाली कोण?' हा प्रश्न उभा ठाकताच पडद्यामागच्या हालचालींना वेग आला आहे. दादांच्या निधनानंतर पक्षाची धुरा सुनेत्रा वहिनींकडे सोपवावी, अशी भावना सामान्य कार्यकर्ता आणि अनेक निष्ठावंत आमदारांची आहे.

मात्र, याच काळात पक्षात एका 'वजनदार' नेत्याची महत्त्वाकांक्षा उफाळून आली आहे. ज्याला आपण सत्तेपुढे शहाणपण चालत नाही असे म्हणतो, त्याचाच प्रत्यय सध्या राष्ट्रवादीत येतोय.

ज्या नेत्याचा डोळा सुरुवातीपासूनच राष्ट्रीय अध्यक्षपदावर होता, त्यांनी आता स्वतःचा मार्ग मोकळा करण्यासाठी निष्ठावंतांचा 'काटा काढण्याचे' राजकारण सुरू केले आहे.

संतांच्या भाषेत सांगायचे तर
तुका म्हणे सत्ता। नास करी चित्ता ॥

सत्तेच्या हव्यासापोटी स्वतःच्याच सहकाऱ्यांविरुद्ध रचले जाणारे हे चक्रव्यूह पक्षाच्या अस्तित्वासाठी धोक्याची घंटा आहे. या संपूर्ण प्रकरणाचा केंद्रबिंदू ठरले आहेत ते म्हणजे मंत्री नरहरी झिरवळ.

झिरवळ यांनी उघडपणे आणि जाहीररित्या सुनेत्रा पवारांच्या नेतृत्वाचा पुरस्कार केला. दादांच्या पत्नीला न्याय मिळावा आणि पक्षाची सूत्रे त्यांच्याच हातात राहावीत, यासाठी त्यांनी आमदारांचा एक मोठा गटही संघटित केला. मात्र, हीच निष्ठा आता त्यांच्या अंगाशी आली आहे.

मंत्रालयातील झिरवळ यांच्या दालनात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) केलेली कारवाई हा निव्वळ योगायोग मानायचा की जाणीवपूर्वक रचलेला सापळा?



दिपक कैतके
मुंबई.

झिरवळ यांच्यासारख्या आदिवासी नेत्याला, जो दादांचा कट्टर समर्थक मानला जातो, त्याला अडचणीत आणण्यासाठी एका ज्येष्ठ नेत्याने थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हाताशी धरून 'गेम' केल्याची चर्चा आता मंत्रालयाच्या कोपऱ्याकोपऱ्यात रंगली आहे.

कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ या म्हणीप्रमाणे, हा 'क्रियाशील' नेता आता आपल्याच मंत्र्यांच्या गच्छंतीची तयारी करत आहे. झिरवळ यांच्या एका लिपिकाला अटक होणे आणि त्याचे माध्यमांमध्ये सलग दोन दिवस भांडवल केले जाणे, ही एक सुनियोजित रणनीती होती.

यामागील मुख्य हेतू हाच होता की, सुनेत्रा वहिनींच्या पाठीशी उभा राहणारा एक भक्कम आधारस्तंभ आधी कोसळायचा, जेणेकरून इतरांमध्ये भीतीचे वातावरण पसरेल. हा प्रकार म्हणजे लेकी बोले सुने लागे असा आहे; म्हणजेच झिरवळ यांच्यावर कारवाई करून उर्वरित आमदारांना 'गप्प राहा, अन्यथा तुमचीही हीच अवस्था होईल' असा संकेत दिला जात आहे.

केवळ झिरवळच नव्हे, तर अजितदादांच्या अपघाताची सखोल चौकशी करण्याची लेखी मागणी करणारे आमदार अमोल मिटकरी आणि पुण्यातील रूपाली ठोंबरे पाटील ह्या देखील आता या 'छुप्या शत्रूच्या' रडारवर आले आहेत.

ज्यावेळी हे पदाधिकारी मुख्यमंत्र्यांना निवेदन द्यायला गेले, त्यावेळीही झिरवळ आणि मंत्री बाबासाहेब पाटील त्यांच्या सोबत होते. हेच चित्र त्या महत्त्वाकांक्षी नेत्याला खटकले असावे.

आता या नाट्याचा पुढचा अंक म्हणजे विद्यमान सहकार मंत्री आणि कट्टर दादा समर्थक असलेल्या इतर मंत्र्यांची कोंडी करणे हा असेल, यात तिळमात्र शंका नाही.

ज्यांनी रक्ताचं पाणी करून आणि खंबीरपणे साथ देऊन दादांसोबत पक्ष उभा केला, त्यांनाच आता आपलेच दात आणि आपलेच ओठ अशी वेदनादायी परिस्थिती अनुभवावी लागत आहे. ज्या पक्षात शिस्त होती, तिथे आता विश्वासाची जागा संशयाने घेतली आहे.

अजितदादांच्या अकाली एक्झिटनंतर पक्ष विखुरला जाण्याची भीती असतानाच, अंतर्गत गटबाजीने असे विद्रूप रूप धारण करणे हे अत्यंत क्लेशदायक आहे. एकता हेच बळ हे ब्रीद विसरून जर नेते एकमेकांचे पाय ओढू लागले, तर येणाऱ्या निवडणुकीत मतदारांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, हे निश्चित.

राष्ट्रवादी काँग्रेसचा हा गट सध्या एका अशा वळणावर उभा आहे जिथे त्याला 'बाहेरच्या' पेक्षा 'घरातील' शत्रूंचा जास्त धोका आहे.

खळ उपद्रव करी।
सज्जना पीडा भारी ॥

या उक्तीनुसार, जेव्हा सत्तेसाठी हापापलेले लोक स्वतःच्याच घरात आग लावण्याचे काम करतात, तेव्हा घराची राखरांगोळी होण्यास वेळ लागत नाही. सुनेत्रा पवार यांनी आता केवळ शोक व्यक्त करून चालणार नाही, तर त्यांना या 'राजकीय चाणक्यांच्या' कुटील कारवाया ओळखून आपल्या समर्थकांची ढाल बनावे लागेल.

शेवटी, महाराष्ट्राची जनता सर्व काही उघड्या डोळ्यांनी पाहत असते. केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे या समर्थांच्या उक्तीप्रमाणे जर पक्षाला वाचवायचे असेल, तर निष्ठावंतांना बळ द्यावे लागेल.

जर या षडयंत्रांना वेळीच पायबंद घातला नाही, तर अजितदादांनी पाहिलेले स्वप्न आणि त्यांनी उभा केलेला हा डोलारा कोसळायला वेळ लागणार नाही. सत्तेच्या या खेळातील 'विभीषण' कोण आहे, हे आता जनतेसमोर हळूहळू उघड होत आहे.

## महाशिवरात्रीचे महत्त्व

वाचक लिहितात

सुख असो वा दुःख, ज्याच्या स्मरणाने मनाला असीम शांती मिळते, तो आहे भगवान शिव. असे श्रेष्ठ शिवतत्त्व जर आपल्याला जास्तीत जास्त ग्रहण करायचे असेल तर महाशिवरात्रीच्या दिवशी आपण शिवभक्ती, शिव उपासना करायला हवी. ॐ नमः शिवाय हा नामजप जास्तीत जास्त वेळ करणे, शिव दर्शन घेऊन शिवाला बेल, अक्षता वहाणे, शिवाला अभिषेक करणे या कृती अतिशय लाभदायी आहेत. या दिवशी अनेक पुरुष व स्त्रिया व्रत करतात. या व्रताने पुष्कळ लाभ होतात असे शास्त्र सांगते. काहीतरी मिळावे यापेक्षा काहीच न मागता केवळ शिवाची कृपा आपल्यावर असावी या कामना विरहित विचाराने व्रत केल्यास आनंद देव आपल्याला अनुभवायला देतो. महाशिवरात्रीच्या दिवशी आपल्या सर्वांकडून अधिक अधिक शिवाची उपासना व्हावी आणि सर्वांना आनंद मिळावा हीच शिवाच्या चरणी प्रार्थना!

सौ. आदिती अमित देखणे
नवीन पनवेल.

## हिंदू कायद्याप्रमाणे स्त्रीधनमध्ये काय काय समाविष्ट होते?

सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट
सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना.

आपण गेल्या काही आठवड्यापासून स्त्रीधनबद्दल माहिती बघत आहोत. हिंदू लॉ अनुसार स्त्रीधन मध्ये काय समाविष्ट आहे, या बद्दल ची संक्षिप्त माहिती आज आपण जाणून घेणार आहोत.

**प्रश्न :** हिंदू कायद्यात स्त्रीधन मध्ये काय काय गणले जाते?

■ आई पासून मिळालेली बक्षीस स्वरूप रक्कम किंवा वस्तू ही स्त्रीधन म्हणून गणली जाते. २) वडिलांपासून मिळालेली बक्षीस ह्यस्त्रीधनह्ण मध्ये गणले जाते. ३) भावाने बहिणीला दिलेले बक्षीस ह्यस्त्रीधनह्णअसते. ४) सासू आणि सासरे यांनी प्रेमाने दिलेली भेट ही स्त्रीधन म्हणून मान्य आहे. ५) Nuptial Fire च्या आधी दिलेली भेट म्हणजे यालाच आपण सोप्या भाषेत असे म्हणू शकतो की सप्तपदीच्या प्रसंगी किंवा त्या आधी मिळालेली भेट सुद्धा स्त्रीधन मध्ये गणली जातात. ६) जेव्हा वधू आई वडिलांचे घर सोडून सासरी जातांना मिळालेली भेट. ७) लग्नाच्या वेळी वराने वधूस दिलेली भेट.

या व्यतिरिक्त नातेवाईकांपासून तथा नवरदेवाच्या नातेवाईकांकडून मिळालेली भेट यास स्त्रीधन म्हणून मान्यता आहे.

**प्रश्न :** वरील सांगितलेल्या भेट मध्ये काय काय येतात?

■ भेट मध्ये रोख रक्कम, दागिने, मौल्यवान वस्तू, मालमत्ता या सर्व गोष्टी समाविष्ट होतात. पुढील आठवड्यात न्यायालय यांनी स्त्रीधन बद्दल काय सांगितले तसेच घटस्फोटीत महिलेस स्त्रीधन वर अधिकार असतो का वगैरे इतर माहिती बघणार आहोत. जी व्यवहारात अत्यंत उपयोगी ठरावी.

■ ■ ■

अशोकायन
प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## शिव प्रार्थना

ब्रम्हा विष्णू महेश
सृष्टी चक्राचे मुलाधार
निर्मिती पोषण संहार
करती जगाचे पालनहार ..

असुरत्वाचे वाढले प्राबल्य
कामातुरांनी
घातले थैमान
त्रिनेत्रधारी
विनविती महीला
भस्म करावे हे हैवान ..!

जगी नांदो सुख शांती
वैराग्य येऊ द्या शरीरी
परोपकारी वृत्तीचा संचार
होऊ द्या आमच्या अंतरी ..!

महाशिवरात्री महोत्सव विशेष

# निसर्गरम्य डोंगरपायथ्याशी वसलेले 'श्री तीर्थक्षेत्र कोंडेश्वर' हेमाडपंथी मंदिर

## महाशिवरात्री निमित्त हजारो भाविकांची मांदियाळी; भव्य यात्रा महोत्सवासाठी प्रशासन सज्ज





**पवन इंगोले**
**अंजनगाव बारी, ( दि.14 )**– अमरावती जिल्ह्यातील बडनेरा येथून पूर्वेस निसर्गरम्य डोंगरांच्या पायथ्याशी वसलेले, अंजनगाव बारी ग्रामपंचायत हद्दीतील 'श्री तीर्थक्षेत्र कोंडेश्वर' हे प्राचीन हेमाडपंथी मंदिर महाशिवरात्री निमित्त भक्तिभावाने उजळून निघाले आहे. सुमारे पाच हजार वर्षांपासूनचे पुरातन शिवालय म्हणून ओळख असलेल्या या देवस्थानात शिवपूजेसाठी हजारो भाविकांची गर्दी होत असून, परिसरात उत्सवी व धार्मिक वातावरण अनुभवास येत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही जिल्ह्यासह राज्यभरातून भाविक-भक्त कोंडेश्वराच्या दर्शनासाठी दाखल होत आहेत. महाशिवरात्री उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, भाविकांच्या सोयीसाठी प्रशासनाने आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

### इतिहास व जिर्णोद्धार

यादव घराण्याच्या राजवटीत हेमाद्रिपंत यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिराची हेमाडपंथी रचनेत उभारणी करण्यात आल्याचे इतिहासकारांचे मत आहे. पुढील काळात भोसले राजघराणे व पेशवे दरबाराने मंदिराची जोपासना केल्याचे उल्लेख आढळतात. अलीकडील काळात विविध भक्त व संतांच्या प्रेरणेने सभामंडप, धर्मशाळा, परकोट, प्रसादालय आदी विकासकामे पूर्ण करण्यात आली असून, सध्या भव्य प्रसादालयाच्या तीन मजली इमारतीचे बांधकाम सुरू आहे.

### वैशिष्ट्यपूर्ण देवस्थान

मंदिराच्या गाभाऱ्यात सतत पाण्याची धार राहते, मात्र शिवलिंग पूर्णपणे कधीही बुडत नसल्याचे भाविक सांगतात. गाभाऱ्याचा तळभाग मजबूत असूनही पाण्याचा निचरा नेमका कुठे होतो, याबाबत रहस्य कायम आहे. येथे 12 ज्योतिर्लिंगांच्या प्रतिमांची स्थापना करण्यात आली आहे. प्रवेशद्वाराजवळील नंदीची भव्य मूर्ती, तसेच दगडी चिऱ्यांवरील कलात्मक हत्ती कोरीव काम भाविकांचे लक्ष वेधून घेते.

### महाशिवरात्री कार्यक्रम

दि. 7 ते 16 फेब्रुवारी 2026 दरम्यान काकडा आरती, अभिषेक, हरिपाठ, सुंदरकांड, संगीतमय भागवत कथा आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. 15 फेब्रुवारी रोजी पहाटे विशेष अभिषेक, पालखी सोहळा, तसेच सोमवार, दि. 16 फेब्रुवारी रोजी काल्याचे कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती कोंडेश्वर संस्थानतर्फे देण्यात आली आहे. महाशिवरात्री निमित्त भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानतर्फे करण्यात आले आहे.

### पौराणिक महात्म्य

स्थानिक परंपरा व श्रद्धेनुसार, भगवान विष्णूच्या वंशातील भरत राजाच्या बंधू विदर्भ राजाने या प्रदेशात भगवान शंकराच्या पिंडीची स्थापना केल्याचे मानले जाते. स्थापत्यविशारद कौंडिण्य मुनी यांच्या हस्ते लिंगस्थापना व प्राणप्रतिष्ठा झाल्याची आख्यायिका आहे. कौंडिण्य मुनींच्या नावावरून या महादेवाला 'कोंडेश्वर' हे नाव प्राप्त झाल्याची भाविकांमध्ये श्रद्धा आहे. प्राचीन काळापासून येथे अतिरुद्र, महारुद्र, कोटी लिंगार्चनासह विविध धार्मिक अनुष्ठाने झाल्याचे सांगितले जाते.


# शिव मंदिरांमध्ये महाशिवरात्रीची जय्यत तयारी



**मारोती पाटणकर**
**चुरणी,( दि.14 )** – महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर शहरासह ग्रामीण भागातील शिव मंदिरांमध्ये भक्तांची मोठी गर्दी होणार आहे. शिवभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण असून मंदिर परिसरात पूजा-अर्चनेची जोरदार तयारी सुरू आहे. मंदिर समितीच्या माहितीनुसार, पहाटेपासून अभिषेक, रुद्रपाठ, भजन-कीर्तन तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. महाशिवरात्री हा हिंदू धर्मातील अत्यंत महत्त्वाचा सण मानला जातो. या दिवशी भगवान शंकराची विधीपूर्वक पूजा केल्यास मनोकामना पूर्ण होतात, अशी भक्तांची श्रद्धा आहे. त्यामुळे अनेक भाविक उपवास ठेवून दर्शनासाठी मंदिरांकडे धाव घेतात. काही ठिकाणी रात्रभर जागरण, भजन आणि कीर्तन कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात येत आहे. भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी मंदिर परिसरात स्वच्छता, आकर्षक रोषणाई आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा करण्यात आली आहे. गर्दी नियंत्रणासाठी स्वयंसेवकांची नेमणूक करण्यात आली असून स्थानिक प्रशासनाकडून सुरक्षेच्या आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, फुले, प्रसाद व पूजेच्या साहित्याच्या विक्रीसाठी दुकाने सजली असून बाजारपेठेतही चैतन्याचे वातावरण आहे. विविध सामाजिक संस्थांकडून पिण्याचे पाणी, प्रसाद व वैद्यकीय मदतीची व्यवस्था करण्यात येत आहे. एकंदरीत, श्रद्धा, भक्ती आणि सामूहिक सहभागामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

# भुलेश्वरी शिवालयांमध्ये भाविकांची अलोट गर्दी होणार

### शिवभक्तांचा जनसागर



**नितीन दुर्बुडे**
**पथ्रोट,( दि.14 )** – महाशिवरात्रीनिमित्त शनिवारी अमरावती शहरासह जिल्ह्यातल्या सर्वच शिवालयांमध्ये सकाळपासूनच भक्तांची अलोट गर्दी पाहायला मिळणार. बम बम भोलेचा गजर सर्वत्र होऊन प्रत्येक मंदिराच्या परिसराला जत्रेचे स्वरूप होते. ठिकठिकाणी साबुदाना उसळ वितरीत होते. भक्तांमध्ये संचारलेल्या उत्साहने सर्वत्र चैतन्यमय वातावरण आहे.

पथ्रोट नजीकच्या गोंडवाघोली – कुणबी वाघोली परिसरात महाभारतकाळात पांडव अज्ञात वासात असताना भुलले. त्यावेळी त्यांनी नदीच्या उगमस्थानी शिवलिंगाची स्थापना केली त्यास भुलेश्वरी हे नाव पडले. पुरातन काळापासुन महाशिवरात्रीला शिवरात्रीउत्सव येथे साजरा होतो. हजारो भक्त येथे दर्शनासाठी पोहचले होते. यात्रेतही त्यांनी फेरफटका मारला. यंदा भुलेश्वरी यात्रा उत्सव समितीकडून 10 टन साबुदाना उसळ वितरीत करण्यात येईल. पथ्रोट पोलिसांचा चोख बंदोबस्त राहील. यंदा भुलेश्वरी संस्थांपर्यंत पोहोचते शिवभक्तांना पोहोचण्याकरिता महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने दोन बसेसची व्यवस्था केल्याने खाजगी वाहनाने प्रवास करावा लागणार नाही.

# श्री खंडेश्वर शिवालय : 850 वर्षांचा पुरातन वारसा, विकासाच्या प्रतीक्षेत जागृत श्रद्धास्थान

## तीर्थक्षेत्राचा 'ब' वर्ग दर्जा; जतन व सर्वांगीण विकासासाठी पुढाकाराची अपेक्षा





**उत्तम ब्राम्हणवाडे**
**नांदगाव खंडेश्वर,( दि.14 )** – अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर येथे वसलेले 850 वर्ष पुरातन श्री खंडेश्वर शिवालय हे विदर्भाच्या धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक मानले जाते. शतकानुशतके अखंड पूजाअर्चा सुरू असलेले हे देवस्थान संपूर्ण विदर्भात अत्यंत जागृत श्रद्धास्थान म्हणून ओळखले जाते. शासनाने मंदिरास तीर्थक्षेत्राचा 'ब' वर्ग दर्जा बहाल केला असला, तरी या ऐतिहासिक स्थळाच्या जतन व सर्वांगीण विकासासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज भाविक व

### 'चावी'ची आख्यायिका

मंदिराच्या बांधकामात दगडांच्या आड 'चावी' बसविल्याची आख्यायिका प्रसिद्ध आहे. श्रद्धा आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा संगम मंदिराच्या वैशिष्ट्यांमध्ये गणला जातो. महाशिवरात्री निमित्त शिवपुराण या शिवालयाच्या बांधकामात दगडांच्या आड एक 'चावी' बसविण्यात आल्याचीआख्यायिका आहे. ही चावी हलवली तर मंदिर कोसळेल, अशी श्रद्धा आहे. अनेक भाविक या चावीची पूजा करतात. काही तज्ज्ञांनी या रचनेचा अभ्यास केल्यानंतर, वीज कोसळल्यास संरक्षण व्हावे यासाठी विशिष्ट तांत्रिक रचना करण्यात आली असावी,असे मत व्यक्त केले आहे. श्रद्धा आणि विज्ञानाचा हा संगम मंदिराला अधिक वैशिष्ट्यपूर्ण बनवतो.सप्ताह, धार्मिक कार्यक्रम आणि भव्य पालखी सोहळा मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. दरवर्षी अंदाजे एक ते दोन लाख भाविक दर्शनासाठी येथे येतात.

### इतिहासाच्या पाऊलखुणा जपणारे शिवालय

हे शिवालय हेमाडपंथी वास्तुशैलीतील उत्कृष्ट नमुना मानले जाते. दगडी बांधकाम, मजबूत रचना आणि भिंतींवरील सूक्ष्म नक्षीकाम मंदिराच्या प्राचीनतेची साक्ष देतात. स्थानिक परंपरेनुसार, कौंडिन्यमुनींचे शिष्य खंड्याने या देवस्थानाची स्थापना केली, अशी मान्यता आहे. वास्तुशिल्पाची भव्यता आणि आध्यात्मिक वातावरण मंदिराच्या पूर्वेकडील प्रवेशद्वारावर कोरलेली प्राचीन शिल्पे आजही आकर्षणाचा केंद्रबिंदू आहेत. दगडावर कोरलेली देव-देवतांची आकृती, फुलांची नक्षी आणि विविध अलंकारिक आकृत्या प्राचीन कलाकृतींचे दर्शन घडवतात. गाभाऱ्यात प्राचीन शिवलिंग विराजमान असून, येथे दर्शन घेताना भाविकांना विलक्षण शांततेचा अनुभव येतो.गाभाऱ्याच्या उत्तरेकडे शिवङ्पार्वती मंदिर, पश्चिमेकडे नृसिंह मंदिर आणि मध्यभागी नंदीची भव्य मूर्ती आहे. या तिन्ही देवळांना जोडणारी रचना प्रशस्त आणि संतुलित आहे. मंदिराभोवती मजबूत दगडी परकोट आहे. महाद्वारासमोर अष्टभुजा देवीचे मंदिर असून, पूर्व दिशेला उंच दीपमाळ मंदिराच्या वैभवात भर घालते. परिसरात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा पुतळाही आहे, जो भक्तांना सामाजिक आणि आध्यात्मिक प्रेरणा देतो.

### सुविधांची गरज

पार्किंग, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, निवास व्यवस्था व माहिती फलक यांसारख्या मूलभूत सुविधांची कमतरता जाणवते. इतिहास, श्रद्धा आणि धार्मिक पर्यटनाची क्षमता लक्षात घेता, मंदिराचा नियोजित विकास करण्यासाठी लोकप्रतिनिधी व प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी खंडेश्वर भक्त नागरिकांकडून होत आहे.

# स्व. न. दा. वासनकर (बावाजी) यांचा 29 वा स्मृतीदिन



**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड, ( दि.14 )**– येथील सर्वोदय शिक्षण समितीचे संस्थापक उपाध्यक्ष स्वर्गीय न. दा. वासनकर उपाख्य बावाजी यांचा 29 वा स्मृतीदिन समारंभ शुक्रवार, दि. 13 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 11 वाजता महात्मा फुले हायस्कूल, कनिष्ठ महाविद्यालय व सौ. गंगाबाई सीतारामजी चौधरी कन्या हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने उत्साहात पार पडला.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त प्राचार्य तथा महात्मा फुले शिक्षण समिती, अमरावतीचे सचिव मा. रमेशपंत पवार होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. प्रदीप कुऱ्हाडे (नवनिर्वाचित उपाध्यक्ष, न. प. मोर्शी), तानसेनजी निकम (राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त संगीत शिक्षक, योगाचार्य) आणि आर. एन. मोहोकर (माजी मुख्याध्यापक) उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी बावाजींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्या सौ. नंदा थोरात यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय गोपाल जावरकर यांनी करून दिला. उपस्थित मान्यवरांनी बावाजींच्या शैक्षणिक, सामाजिक व राजकीय कार्याचा गौरवपूर्वक आढावा घेतला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, संचालक, माजी प्राचार्य, माजी सरपंच तसेच गावातील गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सौ. मेघा सोमकुवर यांनी केले, तर आभार प्रदर्शन आशिष हिंगणे यांनी केले. महाराष्ट्र गीत व पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# माता भिमाईच्या त्याग-संघर्षातून बाबासाहेबांना प्रेरणा : समाजभूषण मधुकरराव अभ्यंकर

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातोश्री भिमाबाई सकपाळ यांची जयंती



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.14 )** – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातोश्री भिमाबाई सकपाळ (आंबेडकर) यांची जयंती राहुल व्यायाम प्रसारक मंडळाच्या कार्यालयात दि. 14 फेब्रुवारी रोजी उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी माता भिमाई यांना अभिवादन करताना संस्थापक अध्यक्ष समाजभूषण मधुकरराव अभ्यंकर म्हणाले, माता भिमाईचा त्याग, प्रेम आणि संस्कार यांमुळेच बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वात संघर्षशीलता आणि समाजासाठी लढण्याची प्रेरणा निर्माण झाली. त्यांच्या या प्रतिपादनाला उपस्थितांनी दाद दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर होते. विचारपीठावर संचालिका डॉ. प्रा. शुभांगीताई अभ्यंकर, सहसचिव सतीश पुंडकर, मंगलाताई वंजारी, प्राचार्य अविनाश पवार, आकाश वंजारी, गोरखनाथ पर्वतकर, समर्थ अभ्यंकर, विहान अभ्यंकर, श्रुती ठाकरे आणि निलेश सावळे उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर यांनी माता भिमाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा उल्लेख करत विद्यार्थी व शिक्षकांना वाचन संस्कृती जोपासण्याचे आवाहन केले. महान व्यक्तींच्या जीवनकार्याचे ज्ञान पुस्तकांच्या माध्यमातून आत्मसात करणे आवश्यक आहे. शिक्षकांसह विद्यार्थ्यांनीही नियमित वाचनाची सवय लावावी, असे ते म्हणाले. कार्यक्रमात माता भिमाई यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले. उपस्थितांनी सामाजिक मूल्ये, शिक्षण व संस्कार यांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे वातावरण प्रेरणादायी व उत्साही होते.

# धामणगाव बाजार समितीत चना खरेदीचा शुभारंभ

## पहिल्याच दिवशी उच्चांकी भाव



**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे,( दि.14 )** – विदर्भातील शेतकऱ्यांना विविध सेवा-सुविधा पुरविणाऱ्या धामणगाव रेल्वे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज बाजार आवारात आज गुरुवारी नवीन चना खरेदीचा शुभारंभ करण्यात आला. बाजार समितीच्या सभापती कविताताई श्रीकांत गावंडे यांच्या हस्ते खरेदीचा प्रारंभ झाला.

चना खरेदीच्या पहिल्याच दिवशी बाजारात चन्याला 5511 रुपये प्रति क्विंटल इतका उच्चांकी भाव मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. आडते ओमप्रकाश लाहोटी यांच्या आडतमधील जुना धामणगाव येथील शेतकरी स्वप्नील विंचुरकर यांच्या चन्याला 5511 रुपये प्रति क्विंटल भाव मिळाला. तसेच आशिष कापसे यांच्या आडतमधील भिल्ली येथील शेतकरी आशिष पाटील यांच्या शेतमालाला 5501 रुपये प्रति क्विंटल दर मिळाला. संबंधित शेतमालाची खरेदी मनिष ट्रेडर्सचे मनिष केला यांनी केली. शुभारंभ कार्यक्रमात चना विक्रीसाठी आलेल्या शेतकऱ्यांचा समितीचे संचालक देवरावजी बमनोटे, संदीप दावेदार, राधेश्याम चांडक, दिनुभाऊ जगताप, डॉ. प्रमोद रोघे, गिरीष भुतडा आणि मुकुंद माहोरे यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. सभापती कविताताई गावंडे यांनी काटापूजन करून हमाल बांधवांचाही गौरव केला. कार्यक्रमाला शेतकरी, व्यापारी व पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. चना खरेदीस शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत असून पुढील काळात बाजार समितीत चन्याची आवक वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

### तरुणीचा विनयभंग

**अमरावती** – शहरातील 21 वर्षीय युवतीचा तिच्या परिचित व्यक्तीनेच विनयभंग केला. आरोपी राहुल तारंबे (वय 30) याने फोन करून तरुणीला कठोरा रोड येथे बोलावले. तरुणी तेथे पोहोचल्यावर आरोपीने तिला लग्नाची मागणी घालती आणि जबरदस्तीने तिचा हात पकडून विनयभंग केला.

# सावंगा बु. (पुनर्वसन) येथे संत गजानन महाराजांचा प्रगट दिन साजरा



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.14 )**– तालुक्यातील सावंगा बु. (पुनर्वसन) येथे संत गजानन महाराजांचा प्रगट दिन मोठ्या श्रद्धा व भक्तिभावात साजरा करण्यात आला. या निमित्ताने संत गजानन महाराजांच्या मूर्तीची विधीवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. प्रगट दिनानिमित्त हरीकीर्तन, होम-हवन यांसह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी श्री गजानन महाराजांची पालखी दिंडी गावातून काढण्यात आली. दिंडीत वारकरी महिला व पुरुषांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पालखी मार्गावर रांगोळी काढून पूजन करण्यात आले तसेच भाविकांच्या वतीने स्वागत व अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले. पालखी सोहळ्यामुळे गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. गण गण गणात बोते या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. या कार्यक्रमाला आमदार प्रताप अडसड यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती लाभली. महाप्रसादाने सोहळ्याची सांगता झाली.

RNINO-46975/1985 Mahasagar Amravati
Printed published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no 9518934504
Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak

आर.एन. आय. नोंदणी क्र. ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# विलीनीकरणाचा विषय आमच्यापुढे नाहीच

## सुनेत्रा पवार स्थिरस्थावर होणे यालाच प्राधान्य : भुजबळ

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :



सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी शनिवारी राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाचा विषय आमच्यापुढे नसल्याच स्पष्ट केले आहे. रोज विलीनीकरण, विलीनीकरण, विलीनीकरण ही काय चर्चा आहे का? ही चर्चा आज, उद्या, महिना किंवा २ महिन्यांनीही करता येईल. या प्रकरणी घाई करण्याची काहीच गरज नाही, असे ते म्हणालेत.

उल्लेखनीय बाब म्हणजे अजित पवार यांचेच गत 28 जानेवारी रोजी झालेल्या एका विमान अपघातात निधन झाले. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने आमची अजित पवारांशी विलीनीकरणाच्या मुद्यावर चर्चा सुरू होती व १२ फेब्रुवारी रोजी विलीनीकरणाची अधिकृत घोषणा होणार होती असा दावा केला आहे. पण अजित पवारांच्या पक्षाने त्यांचा हा दावा फेटाळून लावला आहे. या पार्श्वभूमीवर भुजबळ यांनीही सध्या आपल्या पक्षाचे प्राधान्य विलीनीकरणाला नव्हे तर सुनेत्रा पवार स्थिर स्थावर होण्याला असल्याचे स्पष्ट केले.

**रोज विलीनीकरण काय लावले?**

छगन भुजबळ पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, रोज विलीनीकरण, विलीनीकरण, विलीनीकरण ही काय चर्चा आहे? ही चर्चा आजही करता येईल, महिन्याने करता येईल किंवा दोन महिन्यानेही करता येईल. घाई करण्याचे कारण काय?

सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्यात. राष्ट्रीय अध्यक्ष म्हणूनही आम्ही त्यांची निवड करणार आहोत. त्यानंतर त्या पक्षाचे जे काही प्रमुख लोक आहेत किंवा त्यांना जे योग्य वाटतील त्यांना बोलावून या मुद्यावर चर्चा करतील. शेवटी एवढा मोठा निर्णय दोन्ही बाजूंच्या लोकांशी चर्चा करूनच होईल. त्यावर एवढी घाई करण्याची गरज नाही. परंतु आज ते ठरलेच होते, ते झालेच पाहिजे असे म्हणण्याला काहीच अर्थ नाही.

तिथे नवीन कॅप्टन आलेत. त्यांना बसू द्या. त्यांना काम करू द्या. त्यांना समजून घेऊ द्या. त्यानंतर त्या काय करायचे ते पाहतील. आज आमच्यापुढे हा विषय खरोखरच नाही. सुनेत्रा पवार स्थिर स्थावर होणे व त्यांची पक्षाच्या अध्यक्षपदी निवड करणे हाच आमच्यापुढे प्राधान्यक्रमाचा विषय आहे, असे ते म्हणाले.

छगन भुजबळ पुढे म्हणाले, सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्याचा निर्णय १०० टक्के ठरला आहे. त्यामुळे याविषयी शंकाकुशंका घेण्याची काहीच गरज नाही. आम्ही कॅप्टन नेमले आहेत. ते विचार करतील.

### नरहरी झिरवाळ यांची पाठराखण

भुजबळांनी यावेळी मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या खात्यात घडलेल्या लाचखोरीच्या प्रश्नावरही भाष्य केले. ते म्हणाले, आता हे प्रकरण पोलिसांकडे गेले आहे. पोलिस त्याची चौकशी करतील. गृह खाते, सीएम, डीसीएमपर्यंत काय खरे, काय खोटे ही गोष्ट जाईल. नरहरी झिरवाळ यांनी स्वतःच या प्रकरणात आपला हात असल्याचे सिद्ध झाले तर राजीनामा देण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे त्यांच्यावर टीका चूक आहे.

ऑफिस व मंत्रालयात अनेक लोक काम करतात. त्यामुळे कुणी काय केले त्याच्याशी काय संबंध आहे? या प्रकरणी पोलिस चौकशीमार्फत योग्य ती स्थिती स्पष्ट होईल. नरहरी झिरवाळ पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटण्यास गेले की, केंद्रीय गृहमंत्री अमित शहांना भेटण्यास गेले त्याची मला माहिती नाही. त्यांच्या विभागाचे काही काम असेल, असे ते म्हणाले.

# राज्यातील १ ते ८ वीच्या ४१ लाख विद्यार्थ्यांना थेट दिलासा
# शालेय साहित्याबरोबर दप्तरही मोफत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :

राज्यातील सरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी मोठी आनंदवार्ता समोर आली आहे. राज्य सरकारने मोफत दप्तर देण्याच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता दिली असून यासाठी १६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने १३ फेब्रुवारी रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायदा २००९ आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी अधिक अनुकूल आणि आनंददायी शैक्षणिक वातावरण तयार करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

या योजनेअंतर्गत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वषार्पासून मोफत दप्तर देण्यात येणार आहे. एकूण ४१ लाख ४३ हजार ५४ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. शिक्षण संचालकांनी सादर केलेल्या या प्रस्तावानुसार निधीची मागणी करण्यात आली आणि त्यानुसार १६५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आधीच पाठ्यपुस्तके आणि मध्यान्ह भोजन देण्यात येत असताना आता दप्तराचीही सोय केल्याने सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी सुविधा अधिक वाढणार आहेत.

### सरकारचा मोठा निर्णय : नव्या वर्षापासून लाभ



मात्र, ज्या महानगरपालिकांमध्ये आधीपासूनच विद्यार्थ्यांना दप्तर देण्याची योजना सुरू आहे किंवा त्या उद्देशाने निधी वितरित केला जातो, त्या शाळांना या नव्या योजनेतून वगळण्यात येणार आहे. उर्वरित सर्व सरकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्येच या निर्णयाची अंमलबजावणी होईल. त्यामुळे राज्यातील बहुसंख्य विद्यार्थ्यांना थेट लाभ मिळणार असला तरी काही महापालिका क्षेत्रांमध्ये आधीच्या योजनांमुळे स्वतंत्र अंमलबजावणी होणार नाही.

या निर्णयानंतर पालकांकडून समाधान व्यक्त होत असले तरी दप्तरांच्या गुणवत्तेबाबत अपेक्षा मांडल्या जात आहेत. बाजारात उपलब्ध असलेल्या हलक्या दर्जाच्या किंवा लवकर खराब होणाऱ्या दप्तरांचा पुरवठा होऊ नये, अशी मागणी करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून मजबूत, हलके आणि दीर्घकाळ टिकणारे दप्तर उपलब्ध करून द्यावेत, अशी अपेक्षा आहे. नवीन शैक्षणिक वषार्पासून या उपक्रमाची अंमलबजावणी सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सरकारी शाळांमध्ये आधीच मोफत पाठ्यपुस्तके, मध्यान्ह भोजन आणि इतर सुविधा दिल्या जात आहेत. आता मोफत दप्तराची भर पडल्याने पालकांवरील शैक्षणिक खर्च आणखी कमी होणार आहे. तरीदेखील अनेक ठिकाणी महापालिका आणि जिल्हा परिषद शाळांमधील पटसंख्या घटत असल्याचे चित्र आहे. ग्रामीण भागात इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या वाढत्या प्रमाणामुळे सरकारी शाळांवर परिणाम होत असल्याचे दिसते. काही ठिकाणी विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्याने शाळा बंद करण्याची वेळ येत आहे.

# विमानतळावरून दीड कोटीचा गांजा जप्त

■ वृत्तसंस्था, अमृतसर, दि. १४ :

अमृतसरमध्ये अंमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत सीमाशुल्क विभागाला यश मिळाले आहे. सीमाशुल्क अमृतसरच्या पथकाने स्पॉट प्रोफाइलिंग आणि बॅगेज तपासणीदरम्यान एका प्रवाशाच्या सामानातून 1 किलो 640 ग्रॅम गांजा जप्त केला, ज्याची आंतरराष्ट्रीय बाजारात किंमत सुमारे 1.64 कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे.

हा प्रवासी बँकॉकहून विमानाने श्री गुरु राम दास जी आंतरराष्ट्रीय विमानतळ, अमृतसर येथे पोहोचला होता. सीमाशुल्क अधिकाऱ्यांना त्याच्या वर्तनावर संशय आला, त्यानंतर सामानाची सखोल तपासणी करण्यात आली. तपासणीत बॅगमध्ये लपवून ठेवलेला गांजा सापडला.

सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी तात्काळ आरोपी प्रवाशाला ताब्यात घेऊन अटक केली आणि एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात सतत पाळत ठेवली जात आहे आणि कोणत्याही परिस्थितीत अशा गुन्हेगारांना सोडले जाणार नाही. सीमाशुल्क आणि सुरक्षा यंत्रणा अंमली पदार्थांच्या नेटवर्कवर कडक नजर ठेवून आहेत

नशेविरुद्धच्या युद्धाला म्हणजेच अंमली पदार्थांविरुद्धच्या लढ्याला पुढे नेत सीमाशुल्क विभाग आणि सुरक्षा यंत्रणा पूर्ण सतर्कतेने काम करत आहेत. या कारवाईमुळे स्पष्ट संदेश गेला आहे की पंजाबमध्ये अंमली पदार्थांचा पुरवठा करणा?्यांवर कडक नजर ठेवली जात आहे.

पोलीस आणि सीमाशुल्क विभाग आता आरोपीची चौकशी करून हे शोधण्याचा प्रयत्न करत आहेत की या तस्करीमागे कोण-कोण लोक सामील आहेत आणि हे नेटवर्क किती काळापासून सक्रिय होते. सरकार आणि सुरक्षा यंत्रणांनी लोकांना आवाहन केले आहे की नशेविरुद्धच्या या लढ्यात सहकार्य करावे आणि कोणत्याही संशयास्पद हालचालीची माहिती तात्काळ प्रशासनाला द्यावी.

### न्यायालये, न्यायमूर्तींच्या निवासस्थानांचे
# सुरक्षा ऑडिट सादर करा
## हायकोर्टाचे पोलिसांना निर्देश सुरक्षेप्रकरणी सुमोटो याचिका

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :



उच्च न्यायालयाच्या इमारती, राज्यभरातील न्यायमूर्तींची निवासस्थाने आणि सर्व कनिष्ठ न्यायालयांच्या सुरक्षा ऑडिटचा तपशील सादर करा, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने पोलिस विभागाला दिले आहेत. १७ फेब्रुवारीला होणाऱ्या पुढील सुनावणीपूर्वी हा तपशील द्यावा लागणार आहे.

मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने नुकतेच हा आदेश दिला. न्यायालयीन अधिकारी व कायदेशीर क्षेत्रातील लोकांच्या सुरक्षेबाबत सुप्रीम कोर्टाच्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाने सुमोटो याचिका दाखल करत हे आदेश दिले.

झारखंडमध्ये २८ जुलै २०२१ रोजी धनबादचे अतिरिक्त सत्र न्यायमूर्ती उत्तम आनंद मॉर्निंग वॉकसाठी निघाले होते. त्या वेळी एका रिक्षाने त्यांना मागून जोरदार धडक दिली. यात त्यांचा मृत्यू झाला. नंतर ही हत्या असल्याचे उघड झाले. त्यानंतर देशभरातील न्यायालयीन अधिकाऱ्यांना भेडसावणाऱ्या धमक्यांची सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली होती. ह्यन्यायमूर्ती आणि वकिलांना निर्भयपणे काम करता यावे यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे हे राज्याचे कर्तव्य आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले होते.

# नगरविकास खात्याचे काम कर्म दरिद्री

## भाजप मंत्री गणेश नाईकांचा शिंदेंवर थेट निशाणा : मंत्रीपद काय चाटायचं का? भूखंड परत द्या

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :





नवी मुंबईकरांच्या हक्काच्या भूखंडांवरून मंत्री गणेश नाईक यांनी पुन्हा एकदा संताप व्यक्त केला आहे. मी जर नवी मुंबईकरांसाठी चांगले काम करू शकलो नाही, तर मंत्रीपद काय चाटायचं आहे का? असा थेट सवाल करत त्यांनी नगरविकास खात्यावर टीका केली.

नवी मुंबईतील वाशी येथे झालेल्या जनता दरबारात बोलताना त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, हॉस्पिटल, गार्डन, शाळा आणि रुग्णालयांसाठी मागितलेले भूखंड जनतेला न देता बिल्डरांच्या घशात घालण्याचे काम झाले आहे. माझा राग शांत करायचा असेल तर सर्व भूखंड परत करा, असा इशाराही त्यांनी दिला.

नवी मुंबईकरांच्या सुविधा लक्षात घेऊन आम्ही विविध सामाजिक प्रकल्पांसाठी भूखंडांची मागणी केली होती, असे नाईक म्हणाले. मात्र हे भूखंड देण्याऐवजी काही दलालांच्या माध्यमातून ते बिल्डरांकडे वळवले गेले, असा आरोप त्यांनी केला.

ज्या मंत्रिमंडळात मी स्वतः आहे, त्याच मंत्रिमंडळातील नगरविकास खात्याच्या लोकांनी असे कर्म दरिद्री काम केले, याची मला लाज वाटते, असे ते म्हणाले. त्यांच्या या विधानातून त्यांनी अप्रत्यक्षपणे नगरविकास खाते सांभाळणारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधल्याची चर्चा रंगली आहे.

नाईक यांनी स्पष्ट केले की, नवी मुंबईसाठी मागितलेले भूखंड हे जनतेच्या हितासाठी होते. हॉस्पिटल उभारणी, बागांची निर्मिती, शाळा आणि इतर सार्वजनिक सोयीसुविधांसाठी जागा आवश्यक होती. मात्र ते भूखंड दिले गेले नाहीत. उलट काही दलालांनी हे भूखंड बिल्डरांच्या घशात घातले, असा गंभीर आरोप त्यांनी केला.

मी पक्षाचा आणि प्रशासनाच्या शिस्तीचा आहे, पण जनतेच्या हक्कासाठी बोललो नाही तर मंत्री होण्यात अर्थ काय? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

वाशी येथील जनता दरबारात त्यांनी सिडको आणि महानगरपालिका अधिकाऱ्यांनाही लक्ष्य केले. जनतेच्या हितासाठी असलेली जमीन जनतेलाच मिळाली पाहिजे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

मी मुख्यमंत्र्यांना सांगणार आहे, तुमची इच्छा असेल तर सिडको आणि एमआयडीसीकडील जे भूखंड जनतेच्या विकासासाठी आहेत, ते जनतेला देण्याची व्यवस्था करा. ते झालं तर माझा राग हळूहळू कमी होईल, असे त्यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले. त्यांच्या या वक्तव्यामुळे प्रशासकीय पातळीवरही हालचाली वाढण्याची शक्यता आहे.

गणेश नाईक यांनी आपल्या राजकीय भूमिकेचाही उल्लेख केला. पक्षाने मला मंत्रीपद दिलं, त्याबद्दल मी आभारी आहे. आमदार आणि मंत्री होण्यामागचा उद्देश हा जनतेसाठी काम करणे हा आहे. जर नवी मुंबईकरांसाठी आवश्यक असलेले भूखंड मिळवू शकलो नाही, तर त्या पदाचा उपयोग काय, असा रोखठोक सवाल त्यांनी उपस्थित केला.

# आता नो कॉमेंट : विलीनीकरणावर शशिकांत शिंदे यांचा ब्रेक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :

राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चेला नव्याने उधाण आले असताना, शशिकांत शिंदे यांनी अचानक या विषयावर पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला आहे.

अजित पवार यांच्या अकस्मित निधनामुळे अनेक राजकीय प्रश्न अनुत्तरित राहिले असून, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या एकत्रीकरणाची प्रक्रिया देखील त्यामुळे रखडल्याचे ते म्हणाले. अजित पवार आणि शरद पवार यांच्यात एकत्र येण्याबाबत चर्चा सुरू होती, याबाबत दोन्ही बाजूंच्या नेत्यांकडून वेगवेगळे दावे होत असताना शिंदे यांनी मात्र आता या विषयावर काहीही भाष्य करणार नाही, अशी भूमिका जाहीर केली आहे.

अजित पवार गटातील नेत्यांच्या मते, दोन्ही नेत्यांमध्ये काय चर्चा झाली होती याबाबत स्पष्ट माहिती नाही. मात्र शरद पवार गटातील काही नेत्यांचे म्हणणे असे की, विलीनीकरणाची चर्चा अंतिम टप्प्यात पोहोचली होती आणि १२ फेब्रुवारी रोजी पक्ष एकत्र आणण्याची तयारीही झाली होती.

या पार्श्वभूमीवर शशिकांत शिंदे यांनी राष्ट्रवादी, या मासिकात लेख लिहून अनेक खुलासे केले. त्या लेखात दोन्ही पक्षांचे विलीनीकरण होऊन नेतृत्व अजित पवारांकडे देण्याचा प्रस्ताव चर्चेत असल्याचा उल्लेख करण्यात आला होता. या दाव्यांमुळे खळबळ उडाली.



लेख प्रसिद्ध झाल्यानंतर शशिकांत शिंदे चर्चेच्या केंद्रस्थानी आले. त्यांनी सांगितले की, दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरणासंदर्भात काही निर्णय झाले होते आणि अजित पवार गटातील नेतेही त्याबाबत बोलत आहेत. आम्हीच मागे लागलोय असे चित्र निर्माण केले जात आहे, पण आमच्याकडून कोणतीही गडबड नाही. आम्ही जे बोललो ते सत्य बोललो. मात्र आता हा विषय आम्ही बंद केला आहे, असे ते म्हणाले.

मी जर अजितदादांची चूक झाली असे म्हटले असेल, तर मी माझे शब्द मागे घेतो, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या मते, अजित पवारांना पक्षाच्या विभाजनाबाबत काही दुरुस्ती करायची होती आणि ते त्या विषयावर भावनिक होते. शरद पवार यांच्यासोबत झालेल्या भेटीतही अजित पवारांनी कधी नजरानजर केली नाही, असे शिंदे यांनी सांगितले.

शिंदे यांनी पुढे सांगितले की, राष्ट्रवादी पक्ष पुन्हा जोमाने काम करण्याच्या भूमिकेत आहे. त्यामुळे विलीनीकरणावर आता भाष्य करणे योग्य नाही, असे त्यांचे मत आहे. निवडणुकीनंतर या विषयावर अंतिम निर्णय घेण्याची चर्चा होती. विलीनीकरणाचे सूत्र, नेतृत्व, हे सर्व चर्चेत ठरवले जाणार होते. मात्र आता चर्चा करणारे प्रमुख नेतेच आपल्यात नाहीत, जर-तर वर बोलण्यात अर्थ नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

# मुंबईतील १०० डॉक्टरांनीच दिले २३७ बांगलादेशींना जन्म दाखले

## महापौरांनी घेतलेल्या बैठकीत मनपा प्रशासनाची कबुली

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :



बांगलादेशी घुसखोर पश्चिम बंगालमधील काही शहरांमधून भारतात जन्म झाल्याचे जन्म दाखले मिळवतात, अशी बाब यापूर्वी समोर आली आहे. मात्र, २०१५ आणि २०२४ मध्ये मुंबईतील १०० डॉक्टरांनी २३७ बांगलादेशी घुसखोरांना जन्म दाखले दिले. गंभीर म्हणजे अस्तित्वातच नसलेल्या रुग्णालयांच्या नावावर हे दाखले वाटप झाले आहेत.

महापौर रितू तावडे यांनी माजी खासदार किरीट सोमय्या यांच्या उपस्थितीत घेतलेल्या बैठकीत मनपा प्रशासनाने हा प्रकार झाल्याची कबुली दिली. हे प्रकरण चव्हाट्यावर आल्यावर दाखले रद्द केले, पण मूळ प्रमाणपत्रे घुसखोरांकडेच आहेत, असेही सांगितले. मनपा प्रशासनाने बोगस दाखले देण्याचा संशय असलेल्या १०० डॉक्टरांची यादी महापौरांकडे या बैठकीत सुपूर्द केली.

प्रमाणपत्रांतील पत्त्यावर रुग्णालय नाही. डॉ. अशरफ काझीने २०१५, २०२४ मध्ये प्रसूतीसमयी नसताना प्रमाणपत्रे वाटली. ८ एफआयआर दाखल होऊनही कारवाई नाही. मुंबईत १० हजार बोगस जन्म दाखले वाटप झाले, असा किरीट सोमय्यांचा आरोप आहे. रुग्णालयेच नसताना जन्म दाखले देणे हा देशद्रोह आहे. ३० दिवसांत दाखले जप्त करून दोषींवर कारवाई झाली नाही, तर आम्ही महासभेत प्रशासनाविरोधात कडक प्रस्ताव आणू, असे महापौर रितू तावडे म्हणाल्या.

# राज ठाकरेंच्या भाषणांवर उच्च न्यायालयाची चौकशी

## कथित द्वेषपूर्ण वक्तव्यांचा तपशील मागवला

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :



मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले आहे.

अमराठी भाषिकांविरोधात राज ठाकरे तसेच त्यांच्या पक्षातील कार्यकर्त्यांनी कथितपणे केलेल्या द्वेषपूर्ण वक्तव्यांच्या घटनांची सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने याचिकाकर्त्यांना दिले. घटनांचा तपशील अधिक स्पष्ट स्वरूपात मांडण्यास सांगत न्यायालयाने सुनावणी पुढे ढकलली. या प्रकरणामुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे.

ही याचिका उत्तर भारतीय विकास सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील शुक्ला यांनी दाखल केली आहे. त्यांनी आपल्या अर्जात राज ठाकरे आणि संबंधित कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा नोंदवण्याची मागणी केली आहे. शुक्ला यांनी दावा केला आहे की, त्यांच्या कार्यालयावर सुमारे 30 मनसेशी संबंधित व्यक्तींनी तोडफोड करण्याचा प्रयत्न केला. तसेच समाजमाध्यमांवर पोस्ट करून त्यांना धमकावण्यात आले. आपल्याला आणि आपल्या कुटुंबाला ठार मारण्याच्या धमक्या देणाऱ्या पोस्ट्सचा त्यांनी याचिकेत उल्लेख केला आहे.

मुख्य न्यायमूती चंद्रशेखर आणि न्या. गौतम अंखड यांच्या पीठासमोर गुरुवारी या याचिकेवर सुनावणी झाली. न्यायालयाने कथित घटनांचा तपशील मागवला आहे. शुक्ला यांनी नमूद केलेल्या प्रत्येक घटनेचे स्वरूप, तारीख, ठिकाण आणि त्यासंबंधित पुरावे स्पष्टपणे मांडावेत, असे न्यायालयाने सांगितले. त्यानंतर पुढील सुनावणीसाठी प्रकरण तहकूब करण्यात आले.

याचिकेत शुक्ला यांनी असा आरोप केला आहे की, राज्यात चालवली जात असलेल्या उत्तर भारतीय विरोधी मोहिमेला विरोध केल्यामुळे त्यांना लक्ष्य करण्यात आले.

गुढीपाडवा मेळाव्यातील राज ठाकरे यांच्या भाषणानंतर बँका, मॉल्स आणि इतर ठिकाणी मराठी न बोलणाऱ्या हिंदी भाषिक कर्मचाऱ्यांना लक्ष्य करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे. काही ठिकाणी हल्ल्यांच्या घटना घडल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. या सर्व घडामोडींमुळे सामाजिक तणाव वाढल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

शुक्ला यांनी मुख्यमंत्री, पोलिस महासंचालक, मुंबई पोलिस आयुक्त, राज्यपाल, केंद्रीय गृहमंत्री आणि वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना तक्रारी व ई-मेल पाठवले, मात्र अद्याप गुन्हा नोंदवला गेला नाही. प्रशासनाची ही निष्क्रियता ही राज्यघटनेतील मूलभूत हक्कांचे उल्लंघन असल्याचे त्यांनी याचिकेत म्हटले आहे.

# १२ राज्यांकडून दरवर्षी १२.८ कोटी महिलांना १.९ लाख कोटी रुपये

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :

तामिळनाडूच्या डीएमके सरकारने शुक्रवारी १.३१ कोटी महिलांना ५-५ हजार रुपये हस्तांतरित केले. राज्यात एप्रिल-मेमध्ये निवडणुका होणार आहेत.

मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन म्हणाले, निवडणुकीच्या बहाण्याने कलाईनार मगलिर उरिमई थोगाई योजना थांबवण्याचा प्रयत्न होता. त्यामुळे ३ महिन्यांचे ३ हजार रुपये एकदाच दिले. याशिवाय, उन्हाळी खचार्साठी २ हजार रुपये अतिरिक्त दिले आहेत. सत्तेत परतल्यास मासिक रक्कम १ हजारावरून वाढवून २ हजार रुपये करणार. विरोधकांनी हे पराभवाच्या भीतीने उचललेले पाऊल असल्याचे म्हटले.

मध्य प्रदेश, झारखंड, बिहार व महाराष्ट्रात दिसून आले आहे की, सत्तेत असताना रोख रक्कम हस्तांतरित करणाऱ्यांवर मतदार जास्त विश्वास ठेवतात. सध्या १२ राज्ये १२.८ कोटी महिलांना वषार्ला १.९ लाख कोटी रुपये देत आहेत.

पीआरएसच्या अहवालानुसार, आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये दोन राज्यांत अशा योजना होत्या. २०२५-२६ पर्यंत या १२ राज्यांत सुरू झाल्या. म्हणजे ३ वर्षांत ६ पटींनी वाढ झाली. या १२ राज्यांपैकी ६ राज्यांनी आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये महसुली तुटीचा अंदाज लावला आहे. इकॉनॉमिक सर्व्हेमध्येही अशा योजनांवर चिंता व्यक्त करण्यात आली होती.

राज्यांच्या ताळेबंदातून या योजनांचा खर्च वेगळा केल्यास परिस्थिती चांगली दिसते. जसे कर्नाटकात या योजनांशिवाय जीएसडीपीचा ०.३% महसुली वाढ. तर यांसह ०.६% ची महसुली तूट.

आरबीआयने २०२४ मध्ये इशारा दिला होता की, सबसिडी/कॅश ट्रान्सफरचा वाढता खर्च राज्यांच्या आर्थिक स्थितीवर ताण आणू शकतो. यामुळे अन्य उत्पादक खर्चांसाठी उपलब्ध आर्थिक वावसुद्धा कमी होऊ शकतो.




# विदर्भात हर बोला... हर हर महादेवचा गजर!

■ महासागर प्रतिनिधी / नागपूर , दि. १५ :

महाशिवरात्रीनिमित्त आज विदर्भाच्या कानाकोपऱ्यात हर बोला... हर हर महादेवचा गजर घुमू लागला आहे. महाशिवरात्रीनिमित्त प्रत्येक जिल्ह्यात यात्रेला सुरूवात झाली असून, भाविकांचे जत्थे शिवमंदिरात दर्शनासाठी दाखल झाले आहेत. भंडारा जिल्ह्यातील छोटा महादेव म्हणून प्रसिद्ध गायमुख येथे भाविकांची प्रचंड गर्दी उसळली आहे. तिकडे गोंदिया जिल्ह्यातील प्रतापगड, नागपूर जिल्ह्यात आंभोरा, कामठेश्वर यासह जिल्ह्याजिल्ह्यातील प्रख्यात शिवमंदिर भाविकांच्या गर्दीने फुलून गेले आहेत.

## चैतन्याचे निसर्गरूपी भांडार श्रीक्षेत्र आंभोरा





■ गजानन लांजेवार, कुही, दि. १५ :

आंभोरा हे विदर्भातल व नागपूर जिल्ह्यातील प्रमुख प्राचीन तीर्थक्षेत्र आहे. आंभोऱ्याला विदर्भाची काशी म्हणून ओळखले जाते. अवघ्या महाराष्ट्रात एकमेव पाच नद्यांच्या संगमावर वसलेले एकमेव आंभोरा देवस्थान. वैनगंगा, कन्हान, आंब, मुर्जा, कोलारी या पवित्र पाच नद्यांचा संगम आंभोरा येथे होतो.

ागील वर्षी दर्शनासाठी महाशिवरात्रीला एक लाख भाविक यांनी दर्शन घेतलेला होता. यावर्षी दर्शनासाठी महाशिवरात्रीला २ लाख भाविक येण्याचा अंदाज आहे. महाशिवरात्रीचा दिवस रविवार आल्याने भाविक वाढण्याचा अंदाज प्रशासनाने वर्तवला आहे.

पोलीस प्रशासनाने दरवर्षीपेक्षा विशेष व्यवस्था करत ३० बॅरिकेटस, १७ सीसीटीव्ही कॅमेरे सुरक्षा अमलात आणली जाणार आहे. अप्पर पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक व सहाय्यक पोलीस निरीक्षक पदाचे दहा अधिकारी, ६० अमलदार, १३० होमगार्ड बंदोबस्तात राहणार आहेत.

महाशिवरात्रीला राज्यभरातून भाविक दर्शनासाठी येतात. पहाटेला अभिषेक होईल, त्यानंतर लगेच दर्शनाला सुरुवात केली जाईल. २४ तासांहून अधिक काळ भाविकांना दर्शनलाभ व्हावा, असे नियोजन केले आहे. अशी माहिती आंभोरा देवस्थानचे सदस्य प्रा. रामेश्वर पाटेकर यांनी दिली.

**असा राहील वाहतुकीत बदल**

उत्सव काळात नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलिस प्रशासनाने विशेष वाहतूक योजना लागू केली आहे. या योजनेनुसार १४ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजतापासून १७ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजेपर्यंत कुही आंभोरा मार्गावरून भंडाराकडे जाणाऱ्या जडवाहनांची वाहतूक पूर्णतः बंद राहणार आहे.

या कालावधीत जडवाहनांसाठी कुही-वडोदा-मौदा-भंडारा हा पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आला आहे. संबंधित वाहनचालकांनी पयार्यी मार्गांचा वापर करावा असे, आवाहन करण्यात आले आहे. यात्रा उत्सव शांततेत, सुरक्षित यामुळे वाहतूक कोंडी होणार नाही, अपघात टाळले जातील, यासाठी पोलीस प्रशासन सज्ज आहे. भाविकांनी सूचनांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**व्हीआयपी, स्पेशल पास, अभिषेक बंद**

गर्दीच्या पाश्र्वभूमीवर यंदा व्हीआयपी दर्शन, स्पेशल पास किंवा प्राधान्य प्रवेश पूर्णपणे बंद ठेवण्यात आला आहे. भाविकांना एकाच रांगेतून दर्शन घ्यावे लागणार आहे. येणाऱ्या सर्व दर्शणार्थ्यांना दर्शनाचा लाभ व्हावा अशाप्रकारे सदर नियोजन केलेले आहे. या दृष्टीने श्री क्षेत्र आंभोरा देवस्थान व्यवस्थापक मंडळ कार्यरत आहेत.

**मराठीचा आद्यग्रंथ**

मुकुंदराजांनी शके ११११० मध्ये हरिहरनाथ व रघुनाथांच्या संजीवन समाधीसमोर बसून मराठीचा आद्यग्रंथ 'विवेकसिंधू' लिहिला. 'वैनगंगेच्या तीरी, मनोहर अंबानगरी, तिथे प्रगटले श्रीहरी.

येथे प्रसिद्ध चैतन्येश्वर (महादेव) स्वयंभू शिवलिंग, टेकडीवर कोल्हासुर हरिहरनाथ व रघुनाथांच्या संजीवन समाधी आणि अत्याधुनिक 'स्टेट ऑफ आर्ट' पूल मुख्य आकर्षणे आहेत. हे ठिकाण आध्यात्मिक शांती आणि जलपर्यटनासाठी प्रसिद्ध आहे.

वैनगंगा, कन्हान, आंब, मुर्जा, कोलारी या पवित्र पाच नद्यांचा संगम आंभोरा येथे होतो.

## कोटेश्वर : भाविकांचे श्रद्धास्थान



■ महासागर प्रतिनिधी
खोलापूर/अमरावती , दि. १५ :

भातकुली तालुक्यातील खोलापूर येथील अतिशय पुरातन पूर्णा नदी तीरावर वसलेले श्री कोटेश्वर मंदिर हे भाविक भक्तांचे श्रद्धेचे व धार्मिक आस्थेचे तीर्थक्षेत्र आहे. खेड्यापाड्यातील हजारो लोक महाशिवरात्रीच्या पर्वावर मोठ्या संख्येने भोलेनाथाचे दर्शन घेण्यासाठी आस्थेने येतात. दोन दिवस चालणारा महा शिवरात्रीचा उत्सव साजरा करण्यासाठी श्री कोटेश्वर मंदिराची रंग रंगोटी व आकर्षित विद्युत रोषणाई, परिसर स्वच्छ व आकर्षक मंडप सजवण्यात आले आहे. श्री कोटेश्वर मंदिर भक्तांच्या दर्शनार्थ सज्ज झाले आहे.

महाशिवरात्रीच्या उत्सवाला अनन्य साधारण महत्व असल्याने भाविक भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. लहान मुलांपासून तर युवक व युवती महिला, नागरिक, ज्येष्ठ नागरिक उपवास ठेवून भोलेनाथाची उपासना केल्या जाते.भाविक भक्त उपासनेतून सकाळपासून श्री कोटेश्वर मंदिरात भक्तगण भक्ती भावाने एकत्र जमतात व श्रद्धेने ज्योतिलिंगाची पिंडीची पूजा अर्चा करतात.

ज्योतिलिंर्गाच्या ठिकाणी असलेल्या कुंडाच्या पाण्यातील पिंडीच्या स्नान करून अभिषेक, पूजा अर्चा बेलपत्री वाहून शंकराच्या नावाचा जयघोष केला जातो. महादेवाची वारी करणारे शंकराचे भक्त त्रिशूल घेऊन डफडीच्या तालावर देवा तुज्या वाटेने गा भजनाने भोलेनाथाचे नामस्मरण करून मंदिर परिसरातील वातावरण भक्तीमय केल्या जाते. बहुसंख्य भाविकांना शिवरात्रीचा उपावास असल्याने काही सेवाभावी संस्थेकडून भक्तांना फराळाचे वितरण करण्यात येते.

महाशिवरात्री पर्वाला परिसरातील प्रसिद्ध श्री कोटेश्वर मंदिरात खेड्यापाड्यातील भक्तगण कुटुंबासह दर्शन घेतात. मंदिर परिसरात दुकाने थाटल्या जातात. बेलपत्री प्रसाद खाऊ व खेळणीचे व घरगुती येणाऱ्या वस्तूंचे यात्रेकरू खरेदी करून महाशिवरात्रीचा उत्सव साजरा करतात.

विशेषतः खोलापूर हे गाव पूर्णा नदी तीरावर वसले असल्याने ऐतिहासिक अति प्राचीन महादेवाचे मंदिर या नदीकाठावर वसलेले आहे. काळेश्वर, खोलेश्वर, हरेश्वर, झोमलेश्वर, निळकंठेश्वर इत्यादी महादेवाची मंदिर भाविक भक्तांनी गजबजणार आहे.

श्री कोटेश्वर मंदिर चालणाऱ्या दोन दिवस महाशिवरात्रीच्या उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी श्री कोटेश्वर संस्थानचे अध्यक्ष रावसाहेब देशमुख, संस्थेचे सचिव प्रकाश पांडे, कार्यकारणी मंडळ व पोलीस प्रशासनाकडून विशेष बंदोबस्त ठेवला जातो.

## रामेश्वर महादेव मंदिरात उसळणार भक्तांचा महासागर

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १५ :

अजिंठा पर्वतरांगांच्या पायथ्याशी असलेल्या राजुर येथील श्री रामेश्वर महादेव मंदिर संस्थानचे वतीने महाशिवरात्री यात्रेसाठी मंदिराची रंगरंगोटी व सजावट करण्यात आली आहे. पुरातन असलेल्या या मंदिरात महाशिवरात्रीच्या यात्रेला आज १४ फेब्रुवारी रोजीची पुजा अनुष्ठान व भस्मा यात्रेने सुरुवात झाली आहे.



श्री रामेश्वर महादेव मंदीर राजुर येथे महाशिवरात्री यात्रा दिनांक १५ व १६ फेब्रुवारी रोजी भरणार आहे. या दरम्यान भक्तांचा महासागर उलटणार असल्याने भाविकांसाठी श्री.रामेश्वर महादेव मंदिर संस्थान राजूरचे वतीने या मंदिराची रंग रंगोटी करण्यात आली आहे व मंदिराची सजावट पण करण्यात येणार आहे. आज शनिवारी रात्री पुजा अनुष्ठान व भस्मा आरती चे आयोजन करण्यात आले आहे. १५ फेब्रुवारी रोजी सकाळी आमदार संजय गायकवाड यांचे हस्ते महाआरती व प्रसादाचे वाटप होणार आहे.

दोन दिवशीय यात्रेची व पार्किंग ची व्यवस्था करण्यात आली आहे. महाशिवरात्री ला संपूर्ण दिवस गजानन महाराज संस्थान जांभरून रोड बुलडाणा तर्फे भजनाचा कार्यक्रम भक्तांचा आनंद द्विगुणीत करणार आहे. ठीक संध्याकाळी ६ वाजता संध्याआरतीं होणार आहे. दिवसभर कार्यक्रमाची रेलचेल रहाणार असून संस्थान तर्फे जय्यत तयारी करण्यात आली आहे. स्व.आत्मानंद सरस्वती महाराज यांच्या फोटो चे पुजन व श्री.संत सेवालाल महाराज यांची जयंती पण या दिवशी संस्थान तर्फे साजरी करण्यात येणार आहे.

निमुळत्या रस्त्यामुळे होते रहदारीस होणार अडचण या संस्थानचा विकास झाला असून येथे महाशिवरात्रीला मोठया प्रमाणात महाप्रसादाचे आयोजन भक्तगण करत असतात. या व्यतिरिक्त श्रावणातील सोमवारीही महाप्रसादाचे आयोजन भक्तांचें वतीने करण्यात येते. त्यामुळे संस्थानचे परिसरात सौंदर्यीकरण करण्यात आले आहे.

रामेश्वर मंदीर हे नदीच्या तिरावर असल्याने निसर्गतः सौंदर्य या मंदिराला लाभले आहे. बुलडाणा, मोताळा व परिसरातील भक्तगणांची मोठया प्रमाणात गर्दी महाशिवरात्री निमित्त होणार आहे.



## दुचाकी आणि व्हॅनच्या भीषण अपघातात आजी व नातू जागीच ठार

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १५ :

अकोला-वाशीम रस्त्यावरील हिंगणा वळणावर भरधाव दुचाकी आणि प्रवासी वाहतूक करणाऱ्या व्हॅनच्या भीषण अपघातात चोंडी (ता. पातूर) येथील आजी आणि नातू जागीच ठार झाले. हा अपघात सकाळी साडेनऊच्या सुमारास घडला. मृतांमध्ये निखिल विश्वनाथ ताजणे (२३) आणि त्याच्यासोबत बसलेली त्याची आजी यांचा समावेश आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, निखिल आणि त्याची आजी लक्ष्मीबाई सीताराम ताजणे (६७) हे पातूरहून अकोल्याला एमएच ३७ एए ७०९२ क्रमांकाच्या दुचाकीने वेगाने जात असताना, हिंगणा वळणावर यू-टर्न घेणाऱ्या एमएच २१ एएक्स ०९३४ क्रमांकाच्या व्हॅनशी समोरासमोर धडकले.

धडक इतकी भीषण होती की दुचाकी चालवणारे निखिल आणि त्याची आजी रस्त्यावर फेकले गेले.

त्यांना गंभीर दुखापत झाली आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. मृत दोघेही पातूर तहसीलमधील चोंडी गावातील रहिवासी होते. अपघातानंतर स्थानिकांनी मदत केली. घटनास्थळी गर्दी, वाहतूक काही काळ विस्कळीत सकाळी झालेल्या या दुर्दैवी अपघातामुळे हिंगणा वळणावर बघ्यांची मोठी गर्दी झाली होती, ज्यामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

मृत हे पातूर तहसीलमधील चोंडी गावातील रहिवासी होते. वृत्तानुसार, अपघात झाला तेव्हा नातू निखिल त्याच्या आजीला अकोला येथील रुग्णालयात घेऊन जात होता. अपघातास कारणीभूत ठरलेल्या व्हॅन चालकाविरुद्ध जुने शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती. या घटनेने हळहळ व्यक्त होत आहे.

## मातेच्या मृत्यूचा विरह असह्य मुलानेही संपवले आयुष्य

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :

आईच्या निधनाचे दुःख सहन न झाल्याने मुलाने अंत्यसंस्कारानंतर अवघ्या काही तासांत गळफास घेऊन जीवन संपवल्याची घटना जिल्ह्यातील सावनेर तालुक्यातील रायबासा येथे घडली. या घटनेने मसराम कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

नागपूर जिल्ह्यातील केळवद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रायबासा गावात रामू दयाराम मसराम (५०) हे कुटुंबासह वास्तव्यास होते. बुधवारी त्यांच्या आई मन्नाबाई दयाराम मसराम (७५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. आईशी अत्यंत जिव्हाळ्याचे नाते असलेल्या रामू यांना तिच्या जाण्याचा मोठा धक्का बसला होता, असे ग्रामस्थ सांगतात. गावातील श्मशानभूमीत मन्नाबाई यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्कार आटोपल्यानंतर रात्री रामू यांनी घरातील सदस्यांना काही कामानिमित्त बाहेर जाण्यास सांगितले. कुटुंबीयांना ते विश्रांती घेणार असल्याचे वाटले. त्यांनी घराचा दरवाजा आतून बंद करून घेतला. आईच्या आठवणींमध्ये ते एकटे बसले असावेत, असा समज कुटुंबीयांचा होता.

मात्र सकाळी बराच वेळ दरवाजा न उघडल्याने संशय निर्माण झाला. आवाज दिल्यानंतरही प्रतिसाद न मिळाल्याने दरवाजा फोडण्यात आला. आत पाहताच घरातील पंख्याला साडीचा फास लावून रामू लटकलेल्या अवस्थेत आढळले. तो क्षण कुटुंबीयांसाठी आणि उपस्थित ग्रामस्थांसाठी असह्य ठरला.

घटनेची माहिती मिळताच केळवद पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे. पोलीस तपासातच आत्महत्येचे प्रत्यक्ष कारण स्पष्ट होईल. आईच्या निधनाच्या धक्क्यामुळे रामू नैराश्यात गेले असावेत, अशी चर्चा गावात सुरू आहे. या घटनेने गावात हळहळ व्यक्त होत आहे. आई गेली आणि मुलगाही तिच्यामागे निघून गेला, अशा शब्दांत ग्रामस्थांनी भावना व्यक्त केल्या. एका कुटुंबावर अवघ्या दोन दिवसांत ओढवलेल्या या घटनांनी रायबासा गावावर शोककळा पसरली आहे.



■ नागपूर : महाशिवरात्रीनिमित्त नागपूर शहरातील विविध शिवमंदिरांची सजावट करण्यात आली असून, आकर्षक देखावे उभारण्यात आले आहेत. भगवान शंकराच्या विविध रूपांचे दर्शन या देखाव्यातून साकारण्यात आले आहे.

## अमरावतीत बांधणार कामगारांसाठी ८४६० घरे

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १५ :

राज्यातील औद्योगिक क्षेत्रातील कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी व प्रवासाचा त्रास वाचवण्यासाठी राज्य सरकारने ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. अमरावती जिल्ह्यातील नांदगाव येथे १५० एकर जागेवर राज्यातील पहिला भव्य ह्यभाडे तत्त्वावरीलह्व गृह प्रकल्प साकारणार आहे. १,४६२ कोटी रुपये खर्चाच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने मंजुरी दिली आहे. अनेक कामगार कामाच्या ठिकाणापासून दूर राहत असल्याने त्यांचा वेळ व पैसा प्रवासात खर्च होतो. ही समस्या सोडवण्यासाठी एमआयडीसी क्षेत्राच्या जवळ हा प्रकल्प होत आहे. यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वॉक टू वर्क या संकल्पनेला बळ मिळणार असून कामगार चालत कामावर जाऊ शकतील. या प्रकल्पाचे बांधकाम खासगी बांधकाम व्यावसायिक करणार आहेत.



**प्रकल्पाची वैशिष्ट्ये आणि सुविधा**

आधुनिक तंत्रज्ञान : घरांचे बांधकाम अत्याधुनिक तंत्रज्ञानाने केले जाणार आहे, ज्यामुळे दर्जा उत्तम राहील आणि कामही वेगाने पूर्ण होईल. यात टू बीएचके, वन बीएचके आणि विद्यार्थ्यांसाठी डॉर्मेटरी असे घरांचे विविध प्रकार उपलब्ध असतील.

या घरांचे मासिक भाडे केवळ ३,००० ते ४,००० रुपयांच्या दरम्यान असल्यामुळे कामगारांना आर्थिक दिलासा मिळेल. खासगी बांधकाम व्यावसायिक बांधकाम करतील. प्रकल्पासाठी बिल्डरांना प्रति घर १.५ लाख रुपयांचे अनुदान आणि बांधकामासाठी ५ ब्रास वाळू मोफत दिली जाणार आहे. या प्रकल्पामुळे विविध कंपन्यांमध्ये कार्यरत मजुरांची मोठी सोय होणार आहे.

## राज्यात कर्करोगाचे रुग्ण वाढले




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षांत कर्करोगाच्या रुग्णसंख्येत ११ टक्क्यांनी वाढ झाली आहे, अशी कबुली राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नागपुरातील नॅशनल कॅन्सर हॉस्पिटलमध्ये ऑन्कोलॉजी बियॉन्ड बॉर्डर्स आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उदघाटन कार्यक्रमात ते बोलत होते.

फडणवीस म्हणाले, ऑन्कोलॉजी बियॉन्ड बॉर्डर्स ही संकल्पना स्वतःच सर्व काही सांगते. कोणताही आजार किंवा आरोग्य समस्या कोणत्याही सीमा, दर्जा किंवा भौगोलिक मर्यादा ओळखत नाही. आजच्या परस्पर जोडलेल्या जगात आपण एकत्र येऊन विचारांची देवाणघेवाण करणे आवश्यक आहे.

गेल्या दशकात कर्करोगाचे प्रमाण वेगाने वाढत आहे. संसर्गजन्य रोगांविरुद्ध लढ्यात भारताने यश मिळवले असले तरी कर्करोग हे आरोग्य व्यवस्थेसमोर मोठे आव्हान ठरत आहे. संयुक्त राष्ट्रांच्या आकडेवारीनुसार पुढील १५ ते २० वर्षांत कर्करोगाचे प्रमाण ७५ टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षांत रुग्णसंख्येत ११ टक्क्यांनी वाढ झाल्याचे त्यांनी सांगितले.

आता केवळ उपचार नव्हे तर प्रतिबंधात्मक उपायांवरही भर देण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. संशयित रुग्णांचे तपासणी साधनसामग्री, कार्यपद्धती आणि लवकर निदानाची क्षमता विकसित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

एनसीआय सारख्या संस्थांमुळे केवळ मध्य भारतातीलच नव्हे तर परदेशातील रुग्णांनाही सेवा मिळत असून, अस्थी मज्जा प्रत्यारोपण सारख्या अत्याधुनिक प्रक्रिया येथे होत आहेत, असे त्यांनी सांगितले. राज्यात अशा आणखी संस्थांची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र शासनाने महा कॅन्सर केअर फाउंडेशन या कलम ८ कंपनीच्या माध्यमातून हब अँड स्पोक मॉडेलवर आधारित कॅन्सर ग्रिड उभारण्याचा उपक्रम सुरू केला आहे. राज्यातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत उपचार पोहोचवणे हा त्यामागील उद्देश आहे.

कर्करोग उपचारांतील सर्वात मोठे आव्हान म्हणजे खर्च. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांवर याचा मोठा परिणाम होतो. हा केवळ रुग्णाचा नव्हे तर संपूर्ण कुटुंबाचा संघर्ष असतो. त्यामुळे उपचार परवडणारे करणे अत्यावश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने आयातीत कर्करोग औषधे व उपकरणांवरील कर कमी करून खर्च कमी करण्याचा प्रयत्न केल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.